# समरसता

## साहित्य पत्रिका

वर्ष ५, अंक १२, ऑगस्ट २०२५






आल्या श्रावणाच्या धारा,
मन हिरवळ झालं।
जुनं पानं दुःख त्याचं,
कुठे उडोनिया गेलं।।

माझा श्रावण सावळा,
मुरलीचा नाद आणे ।
साऱ्या सृष्टीच्या बाल्यात,
तान्हा कान्हा जसा खेळे।।

श्रावणाच्या सरी किती,
ओंजळीत साठवाव्या ।
हिरवाईच्या कुशीत
जुन्या आठवांचा ठेवा।।

कधी दाटे ऊन कोवळे,
कधी ओततो पाऊस ।।
अवचित ऐसे - तैसे ,
तरी श्रावणाची हौस ।।

काळ्या कातळ्याच्या उरी ,
हिरवी पाती डुलवतो ।।
भव्य आकाश मंडपी
इंद्रधनु खुलवतो ।।

अनित्याचे सारे खेळ ,
माझा श्रावण खेळतो।।
आला क्षण करी सार्थ
माझा श्रावण सांगतो ।।

**सुचिता रमेश भागवत**

असावा पावसाळा
पडून गेलेला पाऊस
आणि भिजल्या मातीची
ओली ओली कूस !

हिरवाई मनभर रमलेली
ऊन्ह पावसाच्या ताना
फुले उंचावून माना करू द्या
ऋतुगंधांची विचारपूस !

हिरवी विमाने उडवत
मोकाट सुटलेले रावे
इकडे तिकडे बागडणारे
घालू द्या त्यांना धुडगूस !

श्रावणाच्या घरी
पावसाच्या सरी आणि
लोळत पडलेलं ऊन्ह वळवत सोनेरी कूस !

पाकळ्या उलगून
टपटपलेली जाईची फुलं
गंध लुटवून निवांत पहुडलेली
गूज करत मऊलूस !

मिटलेला निळा पिसारा
आत वीजेची गाणी
निळे सावळेसे आभाळ आणि
कधी गोबरा कापूस !

श्रावण खेळे मनमुराद
तळ्यात कधी मळ्यात मजेत
ज्याला त्याला खेळायाला
बोलवत लावून फूस !

असावा पावसाळा
पडून गेलेला पाऊस
आणि मना मनात चालावा
दबंग आनंदाचा उरूस !

**कांचन प्रकाश संगीत**

# समरसता
साहित्य पत्रिका

वर्ष ५, अंक १२, ऑगस्ट २०२५



**संपादक**

रवींद्र गोळे

**संपादक मंडळ**

प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे

डॉ. रमा गर्गे

प्रा. गजानन होडे



**प्रकाशक**
**समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र**


**अंतरंग**


अध्यक्षीय भाषण ४

अवघा रंग एक झाला ९

लोकसाहित्यातील
श्रावण भादवा १४

सत्त्व अन् स्वत्व जपणारं
साकेत प्रकाशन १८

मसणजोगी समाज - भाग २ २१

बंदिशाळा २५

**कविता :**

सुचिता रमेश भागवत

कांचन प्रकाश संगीत



मुखपृष्ठावरचे चित्र
अंतरजालावरून साभार

मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन



संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका
१/६ जैन इस्टेट, विलेज रोड,
भांडूप (प.), मुंबई - ७८

इमेल : samarastaedit@gmail.com



खाजगी वितरणासाठी





भारतीय संस्कृतीत प्रत्येक महिन्याला विशेष महत्त्व असले, तरी श्रावण व भाद्रपद या दोन महिन्यांना अधिक महत्त्व आहे. भारतीय जीवनपद्धतीत अत्यावश्यक मानले गेलेले सण, उत्सव या महिन्यांत असतातच, त्याशिवाय विविध व्रते-वैकल्येही या काळात पाळली जातात. आपल्या पूर्वजांनी जाणीवपूर्वक काही प्रथा, परंपरा रूढ केल्या. त्यामागे पुढच्या पिढीला समाजधारणांची आणि संस्कृतीची व संस्काराची ओळख करून देणे हा मुख्य उद्देश होता. त्याचप्रमाणे समाजाचे एकत्रीकरण हासुद्धा सण साजरा करण्यामागे मुख्य उद्देश आहे. भारतीय जीवनव्यवहारातील कोणतेही सण हे व्यक्तिगत नाहीत, तर समूहाने साजरे करण्याचे आहेत.

सामाजिक अभिव्यक्तीतूनच संस्कृती अधिक सघन होते. या पार्श्वभूमीवर आपण सामाजिक समरसता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करत आहोत आणि साहित्यातून त्याची अभिव्यक्ती करत आहोत. नांदेड येथे नुकत्याच झालेल्या समरसता साहित्य संमेलनातून आपण ही गोष्ट अनुभवली आहे. या संमेलनाचे अध्यक्ष नामदेव कांबळे यांचे अध्यक्षीय भाषण आणि संमेलन वृत्तान्त या अंकात प्रकाशित केले आहेत. त्याचप्रमाणे संस्कृती, लोकसाहित्य व समाजजीवन याविषयी सखोल चिंतन असणारे लेखही या अंकात समाविष्ट केले आहेत.

आपणास हा अंक नक्की आवडेल, याची खात्री आहे.

**- रवींद्र गोळे**




# विसावे समरसता साहित्य संमेलन

## दिनांक २ व ३ ऑगस्ट २०२४, नांदेड

## अध्यक्षीय भाषण

**समरसता म्हणजे स्वत:चे व्यक्तित्व न विसरता मानसिक व भावनिक पातळीवर दुसऱ्या व्यक्तित्वाला आपलेसे करणे असते. त्याची जात जशीच्या तशी ठेवून त्याचे दु:ख, त्याचे प्रश्न, त्याच्या समस्या आपल्या असल्याचे मानून त्याच्याशी वर्तन-व्यवहार करणे म्हणजे समरसता असते. समरसता भाव मनात असतो. त्याला बंधुत्वाचा व राष्ट्रीयत्वाचा परीसस्पर्श झालेला असतो. समरसता ही माणुसकी कवेत घेते. तिचा अंगीकार करूनच भारत अधिक सुदृढ राष्ट्र बनू शकते.**

**नामदेव चं. कांबळे**

मंचावरील स्वागताध्यक्ष मा. खासदार डॉ.श्री. अजितजी गोपछडे, उद्घाटक मा.डॉ. भदंत राहुल बोधी महाथेरो, समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. ईश्वरजी नंदापुरे, संमेलन कार्यवाह श्री. माणिकरावजी भोसले, समरसता साहित्य परिषद कार्यवाह डॉ. प्रसन्नजी पाटील, एकोणविसाव्या समरसता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अक्षयकुमारजी काळे, संमेलनाचे निमंत्रक शिवा कांबळे, आयोजन समितीचे पदाधिकारी, उपस्थित बंधुभगिनींनो,

शेकडो वर्षांपासून दर वर्षी आषाढी आणि कार्तिकी एकादशीला पंढरपुरात संतांचा मेळा भरतो. त्यातून मराठी संतकवींनी सामाजिक समरसतेचा मंत्र जपत आपली जीवनसाधना व काव्यसाधना केल्याचे आपण पाहिले. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणत –

जे जे दिसे भूत, तया मानिजे भगवंत ।।

ते पुढे असेही म्हणत –

हे विश्वचि माझे घर । अशी मती जयाची स्थिर<br>
किंबहुना चराचर । आपणचि जाहला ।।

संत तुकाराम करुणाभाव व्यक्त करताना म्हणत –

‘बुड़ती हे जन । न देखवे डोळा ।<br>
म्हणुनी कळवळा । येत असे ।।

अलीकडचे कवी यशवंत मनोहर म्हणतात –

’काढिला खणुनी काळोख । घर कुठेच दिसले नाही ।

जन्माचे घेऊनी ओझे । उन्मळलो ठायी ठायी ।।'

ही कवी यशवंत मनोहर यांच्या परात्मतेच्या अनुभवाने व्याकूळ झालेल्या मनाची प्रतिक्रियाच नाही, तर सर्वच साहित्यिक कलावंतांची प्रातिनिधिक भावना आहे. प्रबोधन पर्वातील महान समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. ते घटना समितीपुढे भाषण करताना म्हणाले होते की



''राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय ती यशस्वी होऊ शकत नाही.''

सामाजिक लोकशाही ही संकल्पना स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणाले होते की,

''सामाजिक लोकशाही असा जीवनमार्ग आहे की जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना मान्यता देतो. परंतु तो या त्रिसूत्रातून कोणत्याही एका सूत्राचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करीत नाही.''

स्वातंत्र्य समतेपासून अलग करता येत नाही, समता स्वातंत्र्यापासून विलग करता येत नाही आणि स्वातंत्र्य व समता या दोन्हीही सूत्रांना बंधुत्वापासून तोडता येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाहीसंबंधीचा विचार केवळ 'एक व्यक्ती एक मत' या विचारावर उभा नाही, तर 'एक मत, एक व्यक्ती, एक मूल्य' हा विचार त्यांना अभिप्रेत आहे. ज्या समाजात 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' असेल अशाच समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीवादी समाज मानायला तयार होते. ते पुढे असेही म्हणत की, ''समता ही अनुभवण्याची बाब आहे.''

पुढे जाऊन मी तर असेही म्हणतो – समरसता हीदेखील अनुभवण्याची बाब आहे. 'जात नाही ती जात' असे जातीसंबंधाने म्हटले जाते. संत एकमेकांची गळाभेट घ्यायचे, तेव्हा त्यांच्या मनात समरसता भावच होता. आजही वारकरी एकमेकांची गळाभेट घेतात, तेव्हा त्यांच्याही मनात समरसता भावच असतो. जरी भेटीपुरती त्यांची जातभावना विसरली गेली असेल, तरी ती नष्ट झालेली नसते. आजही लोक संतांना संत गोरा कुंभार, संत नरहरी सोनार, संत सावता माळी असेच म्हणताना दिसतात.

मध्यंतरी फेसबुकवर साहित्यिक श्री. लक्ष्मण माने यांची एक पोस्ट झाली होती. तिच्यात ते म्हणाले होते की, 'मी माझी जात केव्हाच टाकली.' त्यावर प्रतिक्रिया देताना मी म्हणालो होतो, 'श्री. लक्ष्मण माने, तुम्ही तुमची जात टाकली असेलही, पण लोक तुमची जात कैकाडी असल्याचे विसरले असतील का? नसतीलच विसरले, कारण जात नसते ती जात असते.'

डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला स्वातंत्र्य, समता, बंधुता ही त्रिसूत्री दिली. आपण त्यांच्या सूत्रातील स्वातंत्र्य स्वीकारले, प्रसंगी आपण बंधुताही पाळतो. परंतु माणसामाणसात समता येत नाही. कारण त्याने न विसरलेली जात! त्यांच्यात समरसता मात्र प्रस्थापित होऊ शकते. तिला जातीचा अडसर येत नाही. समरसता म्हणजे स्वत:चे व्यक्तित्व न विसरता मानसिक व भावनिक पातळीवर दुसऱ्या व्यक्तित्वाला आपलेसे करणे असते. त्याची जात जशीच्या तशी ठेवून त्याचे दु:ख, त्याचे प्रश्न, त्याच्या समस्या आपल्या असल्याचे मानून त्याच्याशी वर्तन-व्यवहार करणे म्हणजे समरसता असते. समरसता भाव मनात असतो. त्याला बंधुत्वाचा व राष्ट्रीयत्वाचा परीसस्पर्श झालेला असतो. समरसता ही माणुसकी कवेत घेते. तिचा अंगीकार करूनच भारत अधिक सुदृढ राष्ट्र बनू शकते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशवासीयांच्या कल्याणासाठी संविधान निर्माण केले. भारतातील अल्पसंख्याक गटाच्या हितरक्षणासाठी त्यांनी संविधानात लोकशाही व सामाजिक, आर्थिक न्याय इत्यादी तत्त्वांचा समावेश केला. जनतेचे शोषण होऊ नये, त्यांची प्रगती व्हावी, त्यांना शैक्षणिक, सांस्कृतिक अधिकार मिळावेत यासाठी त्यांनी आरक्षणासारख्या तरतुदी राज्यघटनेत समाविष्ट केल्या. समाजाच्या सर्व घटकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय मिळावा असा त्यांनी निर्माण केलेल्या संविधानाचा हेतू होता. त्यामुळेच संविधानात नागरिकांना आवश्यक असलेल्या हक्कांसाठी कायद्यांची निर्मीती झाली आहे, हे विसरून चालणार नाही.

परंतु समतायुक्त समाज अद्याप अस्तित्वात येऊ शकला नाही. त्याचे कारण देशातील धर्मविग्रह आणि जातिविग्रह आहे. संविधानाने नागरिकांना समतेचे स्वप्न दाखवले, ते पूर्ण करण्यासाठी कायदे केले, तरीही कायदे अजूनही

मानवी मनातील जात आणि धर्म यांच्याबाबतचा भेदाभेद नष्ट करू शकले नाही, म्हणूनच समरसता साहित्य परिषदेला समरसतेसाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

त्यासाठी व्यापक पातळीवर सामाजिक प्रबोधन होण्याची आवश्यकता आहे. कारण अजूनही आपली मते परंपरेच्या दास्यातून मुक्त झाली नाहीत, अहंकारातून मुक्त झाली नाहीत. मराठी साहित्यात अलीकडे समरसतेचे दर्शन घडत आहे हे खरे आहे. परंतु ते पुरेशा प्रमाणात घडताना दिसत नाही, २ मे १९५४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर नेथे विदर्भ साहित्य संघात भाषण केले होते. तेव्हा ते म्हणाले होते की, ''उदात्त जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये अंगीकारा. त्यांना आपल्या साहित्यातून आविष्कृत करा. आपले लक्ष्य संकुचित व मर्यादीत ठेवू नका. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरती बंदिस्त करू नका. तिचे तेज खेड्यापाड्यातील अंधार दूर होईल असे प्रवर्तित करा. आपल्या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे, हे विसरू नका.'' बाबासाहेबांचा हा संदेश सामाजिक समरसतेचाच संदेश होता.

१९९०नंतर भारतात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरलेली भांडवलशाही अर्थव्यवस्था होय. त्यामुळे खाजगीकरणाला व उदारीकरणाला वेग आला. संपूर्ण जग एक खेडे झाले. समाज बहुसांस्कृतिक झाला. जागतिकीकरणाचा परिणाम दलितांच्या आरक्षणावर होऊन ते मोडीत निघाले. शासनाचे कल्याणकारी स्वरूप बदलले. ते व्यवस्थापन संस्थेसारखे झाले. शिक्षण ही सरकारची जबाबदारी राहिली नाही. शिक्षणाने उद्योगाचे रूप घेतले. विद्यार्थी ग्राहक झाला, तो ज्ञानासाठी नव्हे, तर उदरनिर्वाह करण्यासाठी शिकू लागला.

जागतिकीकरणामुळे समाजजीवनाचे स्वरूप अंतर्बाह्य बदलून गेले. त्यामुळे सामाजिक तसेच वाङ्मयीन मूल्येही बदलली. गेल्या पंचवीस वर्षांत आय.टी. क्षेत्रात क्रांती झाली. इलेक्ट्रॉनिक मीडिया मानवी मनावर सत्ता गाजवू लागला. माणूस आत्मकेंद्री झाला. त्यांच्यातील काहींच्या मनात अहंगंड निर्माण झाले, तर काहींच्या मनात न्यूनगंडाचा शिरकाव झाला.

त्यांना अहंगंडातून अगर न्यूनगंडातून बाहेर काढावे लागेल. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय तत्त्वांवर समाजाला पुन: एकदा उभे करावे लागेल, तरच समरसता तत्त्व विकसित होऊ शकेल.

सामाजिक मूल्ये जपणारे जे वैचारिक व प्रबोधनपर साहित्य मराठी भाषेत आहे, त्या सर्व साहित्यावर महापुरुषांच्या कार्याचा प्रभाव आहे. त्या वाङ्मयाने गेल्या शे-दीडशे वर्षांत समाजपरिवर्तनाचे कार्य केले आहे.

आधुनिक काळातील ललित वाङ्मय या प्रभावातून कसे काय सुटणार होते? मराठी भाषेतील ज्या उत्तम सामाजिक साहित्यकृती आहेत, त्यांवर या महापुरुषांचा प्रभाव आहे. हरी नारायण आपटे किंवा केशवसुत हे दीपस्तंभासारखे त्यांच्या अभिव्यक्तीसह आपल्यासमोर उभे आहेत. आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत. त्यामुळेच

'ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, न मी एका पंथाचा,
तेच पतित की जे आखंडती प्रदेश साकल्याचा !'

अशा रोकड्या अभिव्यक्तीचे खोलवर विश्लेषण करण्याची कोणाला गरज पडू नये.

विश्राम गुप्ते ह्या परिस्थितीला 'परिवर्तन – मानवी मूल्यांचे परिवर्तन' म्हणतात. माझ्या मते परिवर्तन होण्यासाठी आधी प्रवर्तन व्हावे लागते – म्हणजेच उत्तेजन देण्याची क्रिया व्हावी लागते. नंतरच परिवर्तन होत असते. महाभारतात कर्ण दु:शासनाला द्रौपदीचे वस्त्रहरण करण्यासाठी, 'दासी वस्त्रात असली काय, निर्वस्त्र असली काय, सारखीच!' असे म्हणत


साप्ताहिक विवेक
राष्ट्रसाधनेचे अमृतपर्व



योजक संघमहर्षी
मोरोपंत पिंगळे
लेखक : रवींद्र गोळे

रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनाचे सूत्रधार, हिंदूभाव जागरणाचे शिल्पकार, अनेक सामाजिक संस्थाचे संस्थापक मा. मोरोपंत पिंगळे यांच्या जीवन कार्याचा वेध घेणारा चरित्र ग्रंथ

| मूळ किंमत : रु. ५००/-
| सवलत मूल्य : रु. ३५०/-

धनादेश किंवा धनाकर्ष 'हिंदुस्थान प्रकाशन संस्था' या नावाने काढावा
- **Bank Details :** Bank of Maharashtra
- **Account No. :** 20109800154
- **Branch :** Prabhadevi
- **IFSC Code :** MAHB0000318

• नोंदणीसाठी संपर्क :
मुंबई : शीतल खोत – ९५९४९६१८५८, पुणे : धनाजी जाधव – ९५९४९९३८३४,
नागपूर : महेश राव – ९५४५७४१४७४

उत्तेजन देतो. नंतर द्यूतगृहातील दृश्यात परिवर्तन होते. श्रीकृष्ण अर्जुनाला भगवद्‌गीता सांगून अर्जुनाचे प्रवर्तन करतो. नंतर अर्जुनाचे मनपरिवर्तन होते व तो शस्त्र हाती घेतो.

जागतिकीकरणामुळे खाजगीकरण व उदारीकरण आले, परंतु जागतिकीकरणातही जातीयता टिकून राहिली. सवर्णांच्या वर्तन व्यवहारात वरकरणी बदल झाला. उदाहरणार्थ, भिंतीच्या कौलीतला कप गेला. परंतु तो माजघराच्या एका कोपऱ्यात जाऊन बसला. सवर्ण दलितांच्या घरात मांसाहार करू लागले, परंतु त्यांच्या माजघरात अजूनही दलितांना शिरकाव करता येत नाही. पूर्वी समाजात वावरतांना दलितांना जात विचारली जात होती. अलीकडे ती आडनावांवरून ओळखली जाऊ लागली.

समाजाचे वास्तव चित्रण हा कलाकृतीतील वास्तवाचा पाया असतो. जीवन जसे आहे तशीच कलाकृती असावी, रोजच्या अनुभवांचे चित्रण कलेत असावे असा काही सारस्वतांचा आग्रह असतो. परंतु त्यानेच की काय, साहित्याला – त्यातल्या त्यात कवितेला वृत्तलेखनाचे व वृत्तपत्रीय नोंदीचे रूप कसे आले, हे कोणालाच कळले नाही.

वास्तव हे फक्त बाह्य देखाव्यातच नसते, तर ते अंत:स्तरातही असते. लेखक सर्जनशीलतेने व कल्पनाशक्तीच्या मदतीने वास्तव साहित्यकृतीत रेखाटत असतो. तिच्यातील वास्तव कधी खरोखरीचे समाजवास्तव असते, तर कधी ते साहित्यागत समाजवास्तव असते.

वास्तववादी समाजचित्रण व आशय सर्वप्रथम आले ते कवी बा.सी. मर्ढेकरांच्या काव्यात. नंतर ते आढळते कवी ग्रेस यांच्या काव्यात. त्यानंतर दया पवार, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, त्र्यंबक सपकाळे यांच्या कवितेत. अलीकडच्या काळात ते आढळते सुधाकर गायधनी, लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत.

आजच्या पिढीचे जगदीश कदम, प्रफुल्ल शिलेदार, वसंत वाहोकार, शेषराव पिराजी धांडे, अजिम नवाज राही, मोहन शिरसाट हे कवीही त्यांच्या पूर्वसुरींचे बोट धरून चालताना दिसतात. प्रज्ञा लोखंडे, सुचित्रा कातरकर, मनीषा साधू, विजया मारोतकर या कवयित्रीही काव्याचे प्रभावी लेखन करीत आहेत.

अलीकडे स्त्रियांच्या शिक्षणाकडे व प्रगतीकडे विशेष लक्ष दिले जात असल्याने बहुसंख्य स्त्रिया शिकायला लागल्या, विचार करायला लागल्या. त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडू लागला. त्यातूनच आमचेही भावविश्व आहे, आमच्या विश्वाचा सामाजिक व्यवहारात विचार व्हायला हवा, असे त्यांना वाटू लागले. परंतु आधी धर्माने आणि संस्कृतीने स्त्रीला दुय्यम स्थान दिले होते, तिच्या गर्भाशयाला अस्पृश्य मानले होते; आता जागतिकीकरणाने तर स्त्रीला बाजारातच नेऊन बसवले, तिला जाहिरातीचे साधन बनवले.

नव्वदोत्तर कादंबरी लेखन करणाऱ्या व ज्यांच्या कादंबऱ्यामध्ये समरसता भाव वाचायला मिळतो, अशा कादंबरीकारांमध्ये राजन खान, विश्वास पाटील, रंगनाथ पठारे, राजन गवस, नामदेव कांबळे, सदानंद देशमुख, बाबा भांड, बाबाराव मुसळे, श्रीकांत देशमुख, प्रतिमा इंगोले, प्रा. रवींद्र शोभणे, कविता महाजन, तानाजीराव पाटील, शेषराव मोहिते, अशोक पवार व प्रा. रामराव झुंजारे यांचा उल्लेख करावा लागतो.

नव्वदोत्तर काळात आर्थिक, सामाजिक, भावनिक क्षेत्रात मोठे बदल झाले. त्यामुळे स्त्रियांचे जीवन विविध स्तरांवर प्रभावित झाले. अनेक कादंबऱ्यांमधून त्याचे चित्रण वाचायला मिळते. श्याम मनोहर यांची 'खूप लोक आहेत', कविता महाजन यांची 'भिन्न,' नामदेव कांबळेची 'मोराचे पाय' ह्या कादंबऱ्या त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

नव्वदोत्तर काळात शेतीची अवस्था बिकट झाली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढू लागल्या, या सर्वाचा ग्रामीण जीवनावर काय परिणाम झाला ते सदानंद देशमुखांच्या 'बारोमास'मध्ये वाचता येते. भारत काळेच्या 'ऐसे कुणबी भूपाळ'मध्ये आणि शेषराव मोहितेंच्या 'असे जगणे तोलाचे'मध्ये पाहता येते. भटक्या जमातीतील पारधी, कैकाडी, वडार अशा स्त्रियांचा जीवनसंघर्ष 'पारधी', 'पडझड', 'इकन माळ' कादंबऱ्यांमधून वाचता येते.

नव्वदोत्तर ग्रामीण कथांमध्ये ग्रामीण जीवनाच्या जाणिवेतून चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, नामदेव कांबळे, नागनाथ कोतापल्ले, वासुदेव मुलाटे, आसाराम लोमटे, आनंद पाटील इत्यादी कथाकार कथालेखन करीत आहेत. आंबेडकरी जाणिवेच्या कथा लिहिणाऱ्यांमध्ये जयंत पवार, प्रकाश खरात ही उल्लेखनीय नावे आहेत.

वाङ्‌मयीन कलाकृतीत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होत असतो. या आविष्कारात त्याची जीवनानुभूतीची जाणीव असते. वाङ्‌मयीन कलाकृतीच्या निर्मातीच्या वेळी ही जाणीव चेतवली जाते. त्यानंतर कलाकृती निर्माण होते व तिला श्रेष्ठ / कनिष्ठ असा काही एक दर्जा प्राप्त होतो.

प्रत्येक साहित्य परिषदेची, साहित्य संघाची, साहित्य महामंडळाची आपापली ध्येये आणि उद्दिष्टे असतात. त्यानुसार

ते साहित्य संमेलने आयोजित करीत असतात. समरसता साहित्य परिषदेचीही काही ध्येये आणि उद्दिष्टे आहेत. परिषद आपल्या ध्येय–उद्दिष्टांप्रमाणे एखादा विषय नक्की करून साहित्य संमेलन घेत असते व ठरवलेल्या विषयावर सर्वांगाने चर्चा करवीत असते. संमेलनात चर्चिले गेलेले विषय ग्रंथरूपाने संग्रहितही करीत असते.

साहित्यात जसे समाजाचे प्रतिबिंब उमटते, तसेच साहित्यात लेखकाचे, कवीचे मनही प्रतिबिंबित होत असते. त्याच्या मनातले विचार, त्याचे आदर्श, त्याने बाळगलेली मूल्ये ह्या सगळ्यांचे दर्शन साहित्यात घडत असते.

साहित्याचे आपण आत्मनिष्ठ साहित्य व समाजनिष्ठ साहित्य असे दोन प्रकार करू शकतो. त्यात विषम सामाजिक परिस्थिती, त्याविरुद्ध चाललेला व्यक्तीचा किंवा व्यक्तिसमूहाचा संघर्ष, स्वातंत्र्य, समरसता, समता, बंधुता, सामाजिक न्याय इत्यादी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी चाललेले प्रयत्न इत्यादींचे दर्शन घडते. अशा संघर्षात व्यक्ती किंवा समाज यांचा एक तर विजय होतो, नाहीतर पराजय होतो. त्याचे दर्शन साहित्यातून घडत असते.

साहित्यात विशिष्ट प्रकारे समाजाचे दर्शन घडावे, अशी जबरदस्ती आपल्याला करता येत नाही. समरसता साहित्यही त्याला अपवाद नाही. आपण समाजाकडून तशी अपेक्षा करू शकतो. परंतु त्यासाठी फार मोठ्या शिस्तशीर प्रयत्नाची गरज असते. समाज जर सुसंस्कृत समरसता विचाराने भारलेला असेल, तर साहित्यात त्याचे दर्शन घडेल.

समरसता साहित्याने समाजाचे, त्यातील न्याय्य मूल्यांकरिता चाललेल्या संघर्षाचे दर्शन घडवले पाहिजे. लेखकाची तशी धारणा असली, तर त्याला ते सहज शक्य आहे. समरसता साहित्यनिर्मिती करण्यासाठी समाजाने लेखक कलावंताला आग्रह मात्र करू नये. समाजाने लेखकाला तसा आग्रह केला आणि लेखक, कवी तसे साहित्य निर्माण करू लागला, तर साहित्याचा दर्जा खालावून त्याला गौणत्व व येऊ शकते. प्रबोधनकाराचे काम समाजात जागृती करण्याचे आहे, त्यात साहित्यिकही आले. त्यांच्या मनाची जमीन समाजाभिमुख वृत्तीने नांगरली गेली असेल, तरच प्रबोधनाने त्यात समरसतेची बीजे पेरली जाऊ शकतात, समरसता हा समाजाच्या जगण्याचा विषय होऊ शकतो. परंतु त्यासाठी समाजात सौहार्द, सद्भाव, समरसता निर्माण व्हावी लागेल. त्यासाठी अधूनमधून समरसता परिषदांचे आयोजन करायला हवे. शाळा–महाविद्यालयामध्ये कार्यशाळा आयोजित करायला हव्या.

अण्णाभाऊंचे समकालीन मध्यमवर्गीय लेखक जेव्हा आपल्या कोषात रमून साहित्यनिर्मिती करीत होते, तेव्हा अण्णाभाऊ जीवनाच्या लढ्यामध्ये जोरदार प्रयत्न करीत होते, वास्तव व कल्पकता यांचा मेळ घालून साहित्याची निर्मिती करीत होते. त्यांच्या साहित्यात समरसता भावाचे दर्शन घडते.

अण्णाभाऊंच्या काळात समाजात असणाऱ्या समस्यांचे निरसन अद्यापही झाले नाही. सामाजिक अन्याय, शोषण, पिळवणूक तशीच आहे. त्यामुळे अण्णाभाऊंच्या विचारांची समाजाला आजही फार फार गरज आहे.

साहित्य आणि समाज यांचा अनुबंध मोठा आणि व्यापक विषय आहे. साहित्यकृती – मग ती आत्मनिष्ठ असो की समाजनिष्ठ असो, तिला जीवनाचे संदर्भ असतातच. ज्या साहित्यकृतींना आपण सामाजिक साहित्यकृती म्हणून गौरवतो, तिच्यात समाजाची, त्यात चाललेल्या संघर्षाची चर्चा साहित्यिकाने केलेली असते. समाजाच्या पुनर्रचनेचा प्रयत्न केलेला असतो. त्यात आता समरसता मूल्याची भर पडली आहे. त्यासाठी केशवसुतांपासून ढसाळांपर्यंत आपल्याला समरसतेच्या अनुबंधाची निवडक उदाहरणे देता येतील. केशवसुत म्हणतात –

'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत
ती माझी, मी त्यांचा – एकच ओघ आम्हातुनि वाहे
नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे।'

आणि नामदेव ढासळ संदेश देताना म्हणतात –

'आभाळाला आजोबा अन् आजी मानून
ह्याच्या कुशीत गुण्यागोविंदाने राहावे
एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसावर सूक्त रचावं
माणसांचेच गाणे गावे माणसाने.'

एवढे बोलून मी आपणा सर्वांचे, समरसता साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानतो व थांबतो.

जयहिंद, जय महाराष्ट्र!




# अवघा रंग एक झाला

**नांदेडच्या विचारमंथनातून व्यवस्थेचे हलाहल पचवून ‘महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती’ या संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगाप्रमाणे जे साहित्यिक अचल राहिले आणि त्यांच्या लेखनाचे चिंतन करण्यासाठी समाजाला आणि व्यवस्थेला भाग पडले, यावर चिंतनच नव्हे, तर खुलेआम संवाद झाला. तो संवाद इतका प्रभावी होता की प्रत्येक जण आत्ममग्न होऊन स्वत:च्या अंत:करणात डोकावून पाहत आत्मपरीक्षण करत होता. संमेलनाच्या विषयाप्रमाणे परिसंवादाचेही विषयही भारावून टाकणारे होते.**

**जगन्नाथ हुक्केरी**
९८५०४७०७००

‘समरस ते साहित्य, समरस तो साहित्यिक’ हे ब्रीद घेऊन गेल्या वीस वर्षांपासून साहित्यक्षेत्रात समरस होत विषयनिष्ठ साहित्य संमेलने भरविणारी आणि वेगवेगळ्या विषयांना वाचा फोडणारी समसरता साहित्य परिषद. याच समरसता साहित्य परिषदेच्या वतीने ‘नव्वदोत्तरी साहित्य आणि समरसता’ हा विषय घेऊन गुरू गोविंदसिंहजी साहित्यनगरी, नांदेड येथे २०वे समरसता साहित्य संमेलन पार पडले. या संमेलनात सगळे जण इतके समरस होऊन गेले, त्यावरून केवळ चळवळीचा हा सोहळा नव्हता, तर अक्षरश: समतेचा मेळा वाटला. विद्यार्थ्यांपासून ते रसिक, ज्येष्ठांपासून ते बालकांपर्यंत, युवकांपासून ते रक्षकांपर्यंत आणि नारीशक्तीपासून ते किन्नर भगिनींचा सहभाग असलेला हा विचारांचा जागर पाहून ‘अवघा रंग एक झाला’ असेच वाटले. चळवळीच्या या साहित्यसोहळ्याच्या रंगी सारस्वतांबरोबरच रसिक, अभ्यासक, विचारवंत रंगून गेले, हे या संमेलनाचे केवळ यश नव्हे, तर त्याचे बाहू विस्तारत असल्याचे द्योतकच आहे.

‘अवघा रंग एक झाला । रंगि रंगला श्रीरंग ।।१।।  
मी–तूंपण गेले वायां । पाहतां पंढरीच्या राया ।।२।।  
नाही भेदाचें तें काम। पळोनि गेले क्रोध काम ।।३।।  
देही असोनि विदेही। सदा समाधिस्थ पाही।।४।।  
पाहते पाहणें गेले दूरी । म्हणे चोखियाची महारी ।।५।।’

संतश्रेष्ठ चोखामेळा यांना अभिप्रेत असलेल्या आणि सर्वांना सामावून घेत त्यांच्यात समरस होण्यासाठी सतत विचारांचे बीजारोपण करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या समरसता साहित्य परिषदेने आतापर्यंत जळगावपासून ते गोवा आणि आता मराठवाड्यातील लातूरनंतर नांदेड येथे संमेलन घेऊन






केवळ विचारांची पेरणी केली नाही, तर संविधानाला अभिप्रेत आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील समाजनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवली. अनेक विचार पुढे आले. त्यात 'केवळ मी नाही, तर तुम्ही' हा संदेश देत केवळ वैचारिक मांडणी करण्यावर भर न देता समाजाला अपेक्षित आणि बाजारू होत असलेल्या व्यवस्थेला विचार करायला लावणारा महामंत्र 'नव्वदोत्तरी साहित्य आणि समरसता' या विषयातून दिला गेला. व्यवस्थेचे आसूड शब्दांच्या शस्त्रांनी बाजूला सारत वैचारिक क्रांती करण्यास भाग पाडलेले पद्मश्री नामदेव कांबळे हे संमेलनाध्यक्ष होते, हीच या संमेलनाची नवी वाट होती. याच वाटेवरून साठोत्तरीनंतर नव्याने रुजलेल्या आणि समाज, व्यवस्था, यंत्रणा, दारिद्र्य, दैन्य, जागतिकीकरण, जीवघेणी स्पर्धा, गुदमरून जाणारी समाजमने यावर धाडस करून ज्यांनी साहित्याची चळवळ आपल्या शब्दांनी आणि पुस्तकांनी सुरू केली, त्या साहित्यिकांच्या विचारांवर मंथन घडले. समुद्रमंथनातून हलाहल पचवून भगवान शंकरांनी अमृत वाचविले. तसेच नांदेडच्या विचारमंथनातून व्यवस्थेचे हलाहल पचवून 'महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती' या संतश्रेष्ठ तुकोबारायांच्या अभंगाप्रमाणे जे साहित्यिक अचल राहिले आणि त्यांच्या लेखनाचे चिंतन करण्यासाठी समाजाला आणि व्यवस्थेला भाग पडले, यावर चिंतनच नव्हे, तर खुलेआम संवाद झाला. तो संवाद इतका प्रभावी होता की प्रत्येक जण आत्ममग्न होऊन स्वत:च्या अंत:करणात डोकावून पाहत आत्मपरीक्षण करत होता. संमेलनाच्या विषयाप्रमाणे परिसंवादाचेही विषयही भारावून टाकणारे होते. त्याला तोडीस तोड सर्व घटकांतील सहभाग भावणारा ठरला. श्री गुरु गोविंदसिंघजी साहित्यनगरीत कै. गंगाधरराव दादा पवार व्यासपीठावर रंगलेल्या उद्घाटन सत्रामध्ये सहभागी झालेल्यांच्या चेहऱ्यांवर एक आत्मिक समाधान दिसत होते. शिवाय श्री संत बाबा बलविंदरसिंघजी, स्वागताध्यक्ष खा. डॉ. अजित गोपछडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती आणि त्यांनी मांडलेले विचार हा समरसतेचा महामंत्रच ठरला.

नव्वदोत्तरी साहित्य बदलते स्वरूप, जागतिकीकरण

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त आणि उत्साहवर्धक सहभाग

स्वयंवर मंगल कार्यालय येथून सकाळी आठच्या सुमारास ग्रंथदिंडीला प्रारंभ झाला. या दिंडीत ध्वज व तुतारी, शिवराय व जिजाऊ यांच्या वेषभूषेतील चिमुकले होते. नाना पालकर शाळेचे लेझीम पथक, साउंडचा टेम्पो, ज्ञान भारती विद्या मंदिर शाळेच्या लेझीम संघाच्या मुली, भारतमाता, विठ्ठल-रुक्मिणीचा रथ, राणी लक्ष्मीबाईंची वेषभूषा, ग्रंथपालखी, कळस, वृंदावन, संत, वारकरी व टाळकरी, भजनी मंडळे यांचा मोठा सहभाग होता. या दिंडीत राणी लक्ष्मीबाई माध्यमिक विद्यालय (यशवंत नगर, नांदेड), नाना पालकर शाळा, ज्ञान भारती विद्या मंदिर यासह अनेक शैक्षणिक संस्थांच्या पुढाकाराने वातावरण भारावले होते.

### लोककलावंतांमुळे ग्रंथदिंडीला लागले चार चाँद

विशेष म्हणजे या दिंडीत लोककलावंतांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरला. वासुदेव, गोंधळी, जोशी, मसणजोगी, नाथजोगी, बहुरूपी, मदारी कलावंतांनीही दिंडीत रंगत आणली. भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटना व भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या माध्यमातून सर्व कलावंतांना दिंडीत स्थान देण्यात आले. स्वयंवर मंगल कार्यालय, सरपंच नगर, मालेगाव मार्गावरून भक्ती लॉन्समध्ये ही ग्रंथदिंडी पोहोचली, तेव्हा सगळ्यांनी स्वागत करत समरसतेचा जयजयकार केला.



आणि समाज परिणाम व समस्या, नव्वदोत्तरी साहित्यात दिसणारे औद्योगिकीकरण, महानगरीय जाणिवा, नवे विषय नवी मांडणी, नव्या संवेदना या परिसंवादाने भूतकाळाच्या डोंगरकपारीतून भविष्याची पहाट उजाडण्याची प्रेरणा दिली. प्रदीपदादा रावत (पुणे) यांची मुलाखत फार काही सांगून गेली. 'वंचितांचे नव्वदोत्तरी साहित्य' या परिसंवादातील दलित-उपेक्षित समाजातील आत्मकथने, नव्वदोत्तरी काळातील

**समरसतेच्या राजमार्गावरील पांथस्थ किन्नर भगिनी**

विसाव्या समरसता साहित्य संमेलनाचे नियोजन, आयोजन, व्यवस्थेमध्ये किन्नर भगिनींचा मोठा सहभाग होता. प्रत्येक ठिकाणी त्यांचा वावर आणि नियोजनासाठी सुरू असलेली धडपड फारच प्रेरणादायक आणि उत्स्फूर्त होती. स्वागतापासून ते ग्रंथदिंडी, उद्घाटन सत्र, कविसंमेलन, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, समारोप, जेवणासह अन्य नियोजनामध्ये त्यांनी पूर्णवेळ योगदान दिले. यामुळे 'समरसतेच्या राजमार्गावरील पांथस्थ' म्हणूनच त्यांचे वर्णन करण्यात आले. त्यात रंजिता बकश गुरू, फरीदा बकश (गुरुमाय), जया बकश, बिजली बकश, अर्चना बकश, प्रिया पवार, गौरी बकश यांचा सेवाभाव मनाला भावणार होता. किन्नर भगिनी अर्पिता यांनी कविता सादर करून मुख्य विचारपीठाला चिंतन करण्यास भाग पाडले. उपस्थित रसिकांनीही त्यांच्या प्रत्येक शब्दाला दाद देत त्यांच्या भावनेची कदर केली. त्यांना मनापासून आदरही दिला.

**रक्षक झाले रसिक**

मोर्चा, आंदोलने, रॅली, महत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे सोडा.. साधी सभा, संमेलने, सण-उत्सव म्हटले की पोलिसांवरचा ताण वाढलेला दिसतो. त्यांना श्वास घ्यायलासुद्धा उसंत मिळते की नाही, असेच वाटते. पण यंदाच्या संमेलनामध्ये वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांपासून ते होमगार्ड बंधुभगिनींपर्यंत ज्यांच्यावर संमेलनाच्या सुरक्षेची जबाबदारी होती, त्यांनी चक्क शांततापूर्ण, संस्कारसंपन्न साजरे होत असलेल्या संमेलनात रसिक म्हणूनच आपली कामगिरी बजाविली. इतक्या सुसंस्कृतपणाचे दर्शन नांदेडच्या संमेलनात घडले. अगदी सकाळपासून ते रात्री व्यासपीठावरील हालचाल शांत होईपर्यंत प्रत्येक घटनेचे नव्हे, तर प्रत्येक शब्दाचे श्रवण करण्यात संमेलनातील त्यांचे दोन दिवस गेले. यातून त्यांनी रक्षकाची भूमिका बजावत विचारांचे श्रवणही केले. त्यांच्या आयुष्यातला कदाचित हा पहिलाच अनुभव असावा.



चित्रपट, कथा, नाटक इत्यादी माध्यमांतून दलित, वंचित व महिलांचे चित्रण, नव्वदोत्तरी साहित्यातील दलित, वंचित काव्यांचे बदलते स्वरूप या विषयांनी प्रत्येकाला भूतकाळात हरवायला भाग पाडले. काही जण विचारमग्न झाले, आपसात पुटपुटले, इतके ते या विषयाशी समरस झाले होते. संतकवी श्री दासगणू काव्यमंच येथे नंदिग्राम काव्ययात्रा झाली. यात नांदेडपासून ते सोलापूर, पुणे, मुंबई, कोल्हापूरच्या कवींनी सहभाग घेत आपल्या रचनांच्या रूपाने समसरतेची ज्योत प्रज्वलित केली. यामुळे समाजमनाच्या हृदयाची कवाडे उघडी झाली आणि संविधानावर आधारित आणि बलशाली झालेल्या भारताच्या अखंडतेची, एकतेची आणि देशप्रेमाची उजळणीच झाली. सांस्कृतिक कार्यक्रमाने तर पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व, ममत्व, देशाभिमान, समाजाविषयी तळमळ, विकासाभिमुख दृष्टीकोनाचा इतिहास समोर उभा केला. किन्नर भगिनींनी आपला कलाविष्कार सादर करून सगळ्यांची वाहवा तर मिळविलीच, त्याचबरोबर आपणही समसरतेच्या वाटेवरील पांथस्थ आहोत, हे ठणकावून सांगितले.

डॉ. राजेंद्र नाईकवाडे यांच्या बीजभाषणाने संमेलनाच्या विचाराची उंची वाढविली. आधुनिक सामाजिक–राजकीय चळवळी व नव्वदोत्तरी साहित्य या परिसंवादात भटके विमुक्तांच्या क्षेत्रात संघाने उभी केलेली चळवळ, रचना व

**नेटके नियोजन, उत्तम भोजनव्यवस्था**

अपेक्षित होते त्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक रसिकांनी संमेलनाला हजेरी लावली. नांदेडच्या नगरीत जमलेला हा समरसतेचा मेळा बघून कित्येकांच्या पोटात गोळाही आला असेल. पण त्या गर्दीला पुरून उरेल इतके नेटके नियोजन संयोजकांनी केले होते. कोणाची ना तक्रार, ना खंत. प्रत्येक जण खूश होऊन निवासाबरोबरच भोजनव्यवस्थेचे कौतुक करत होते. रोज बदललेला मेनू, त्याबरोबर उत्तम नाश्त्याची सोय. मागणीखातर मठ्ठाही दिला. सगळ्यांनी भोजनाचा मनसोक्त आस्वाद घेत, मठ्ठ्याचे घोट घेत तृप्तीची ढेकर देताना समाधान व्यक्त केले.

**संमेलनाच्या दारी, आरोग्याची वारी**

यंदाच्या संमेलनामध्ये येणाऱ्या साहित्यिकांबरोबरच रसिकांच्या आरोग्याचीही चांगली काळजी घेण्यात आली. प्रथमोपचार केंद्र सुरू करून तपासणी करण्याबरोबरच गोळ्या औषधेही देण्यात आली. बीपीच्या, शुगरच्या तपासणीबरोबरच सर्दी, खोकला, ताप, कणकण, हातपाय गळणे, पित्त, डोकेदुखी, अंगदुखी यासह किरकोळ लक्षणांवर उपचार करून समरसता साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारात उत्तम आरोग्यसेवा देण्यात आली. पहिल्यांदाच विचारांच्या उत्सवात आरोग्याचा जागर घातलेला प्रसंग अनुभवता आला.



व्याप्ती, चळवळी स्व–केंद्री झाल्या आहेत का?, स्वातंत्र्योत्तर काळात चळवळी राजकारणाने अपहृत केल्यात का?, सेवाक्षेत्रातील सांस्कृतिक पुनरुज्जीवनवादी सुधारणा कार्यांना साहित्याने बहिष्कृत का केले आहे? हे विषय रसिकांसह अभ्यासकांनी फार मनावर घेतले, हीच या संमेलनाची फलश्रुती ठरली.

गझल मुक्तमंचमध्ये गझलकारांनी तिरस्कार, बहिष्कार, समाजातील व्यंग, परिवारवाद, एकाधिकारशाहीच्या या युगातील दंभावर चांगलेच आसूड ओढले. संमेलनाध्यक्ष पद्मश्री नामदेव कांबळे यांच्या निवडक साहित्यकृती विद्यार्थ्यांच्या नजरेतून मांडण्यात आल्या. परिवर्तनवादी साहित्य असल्याचे सांगत समाजाला समरस होण्याची भावना त्यांनी आपल्या साहित्यातून मांडल्याचा सूर वक्त्यांनी आळविला. समारोपसत्राने भरभरून नक्षत्रांचे देणेच दिले. एकाहून एक सरस विचार मांडण्यात आले. कार्यवाह डॉ. प्रसन्न पाटील यांनी समरसतेच्या ब्रीदवाक्यापासून ते विचार, कृतीपर्यंत प्रवास कथन केले. मध्येच आडकाठी आणणाऱ्यांचे कान टोचत दादा इदाते यांचे उदाहरण दिले. समरसता म्हणजे आम्ही नीळकंठ आहोत, हे सांगितले. चांगले करण्यासाठी विष पचविण्याची ताकद म्हणजेच समरसता भाव. ‘नांदेडमध्ये संमेलन सोडा, पाऊल तर ठेवून बघा’ असे म्हणणाऱ्यांना संमेलन यशस्वी झाले आणि यातील व्यापक, लक्षणीय सहभाग हेच मोठे उत्तर असल्याचे त्यांचे वाक्य सगळ्यांचे कान भरून उरले. साहित्य संमेलनाच्या आयोजनात अभिनव भारत शिक्षण संस्थेचा, ज्ञानभारती विद्या मंदिराचा मोठा पुढाकार होता. इतरांचा सहभाग ही संमेलनाची ताकदच ठरली.

### आदरातिथ्य, वाहनव्यवस्था

येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांसह रसिकांना, निमंत्रितांना आदरातिथ्यपूर्वक विचारपूस करण्याबरोबरच त्यांना येणाऱ्या अडचणींची काळजी घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तैनात करण्यात आली होती. बस स्थानकासह रेल्वे स्थानकावर, अन्य थांब्यावर पाहुणचार आणि ने–आण करण्यासाठी स्वयंसेवकांचा राबता होता. शिवाय मुक्कामाच्या ठिकाणी जाण्यापासून ते संमेलनस्थळी येण्यासाठी स्वतंत्र वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे साहित्यिकांबरोबरच रसिकांची आणि इतर पाहुण्यांची वाहतुकीसाठी अबाळ झाली नाही.




# लोकसाहित्यातील श्रावण भादवा

**लोकपरंपरेतून पुढे आलेले कहाण्या, जात्यावरच्या ओव्या, खेळांची गाणी, हादग्याची गाणी, बैलपोळ्याच्या झडत्या हे साहित्यप्रकार म्हणजे महाराष्ट्राचा आत्मा आहेत. मुद्दाम रचायचे म्हणून हे रचलेले नाहीत. सहजपणे स्फुरलेले, भावना स्पष्टपणे व्यक्त करणारे, प्रसंगी मनात साचलेल्या गोष्टींचा निचरा करणारे असे हे साहित्यप्रकार आहेत. यात कसलाही अभिनिवेश नाही. त्यामुळे ते अस्सल आहेत. खरे आहेत.**

**सौ. अंजली दिवेकर**

९८६०३९१०७५

श्रावण म्हटले की मराठी मनाला धुमारे फुटतात. ऊन-पावसाचा पाठशिवणीचा खेळ, सृष्टीच्या अंगोपांगावर चमचमणारी नवी झिलई यांच्यामुळे वातावरणात उत्साह भरतो आणि तो मनामनात परावर्तित होत राहतो. 'क्षणे क्षणे यत् नवताम् उपैति' अशा सृष्टिसौंदर्याच्या दर्शनाने कलेला, प्रतिभेला बहर येतो. पावसाच्या धारांतून, रानाच्या हिरवाईतून, काळ्या काळ्या ढगातून त्या अनादि-अनंताचा साक्षात्कार होत राहतो. अशा या भारलेल्या वातावरणात सश्रद्ध मनाला ओढ लागते ती परमेश्वराच्या सान्निध्याची, त्याच्या पूजनाची, त्याच्या गुणसंकीर्तनाची आणि त्याच्या कोडकौतुकाचीसुद्धा!

त्यामुळेच या काळात व्रतवैकल्ये, सण, उत्सव हे अगदी रांगेने आलेले दिसतात. माणसाला माणसाशी जोडणारे असे आपले सण आहेत. यातून अनेक प्रकारे समाजाचे एकत्रीकरण होत असते. या व्रत-उत्सवांच्या परंपरा शेकडो वर्षे मनोभावे जपल्या गेल्या, त्यात रंगून जाऊन साजऱ्या केल्या आणि अजूनही लोक तितक्याच उत्साहाने त्यात सामील होत आहेत. या परंपरांच्या शेकडो वर्षांच्या प्रवाहात साहजिक असा लोकसाहित्याचा प्रवाह मिसळत गेला, त्यामुळे त्या परंपरा अधिक रंगतदार होत गेल्या. कहाण्या, कथा-कीर्तने, ओव्या, लोकगीते, उखाणे, म्हणी अशा लोकसाहित्यातून श्रावण-भादव्यातल्या या परंपरांचे रूप अधिक ठाशीव होत गेले, पिढ्यानपिढ्या सहजपणे स्वीकारले गेले.

श्रावण-भादव्यातल्या या पर्वाची सुरुवात नागपंचमीपासून होते. या शेतीप्रधान देशाच्या परंपरेने नागाला मित्रच नव्हे, तर भाऊ मानले, देव मानले. त्याला या दिवशी पूजेचा मान दिला. नागपंचमीचे व्रत का आणि कसे करावे, हे सांगणाऱ्या बऱ्याच कहाण्या आहेत.





व्रताच्या कहाण्या हा एक नमुनेदार साहित्यप्रकार आहे. जशी दर बारा कोसांवर भाषा थोडे वेगळे रूप घेते, तसे कहाण्यांचे तपशीलही ठिकठिकाणी वेगळे असतात. पण कहाण्यांची भाषा नेहमीच वैशिष्ट्यपूर्ण असते. कुठे छोट्या छोट्या वाक्यांची प्रवाही रचना, तर कुठे पाठोपाठच्या वाक्यात यमकाची योजना. अशा या कहाण्या ऐकणाऱ्याला बांधून ठेवतात, त्याच्या तोंडात बसतात आणि सहजपणे लोकसाहित्याच्या प्रवाहात सामील होतात. प्रत्येक व्रतासाठी कथा–कहाण्या असतात, ओव्या असतात, गाणी असतात, ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अलगदपणे जातात, त्यात भर पडत राहते. अशा या साहित्यभांडाराचे कर्ते अज्ञातच राहतात. समाजाच्या भावनांचे, श्रद्धांचे, विश्वासांचे प्रतिबिंब असे हे साहित्यभांडार परंपरेतून पुढे जात राहते.

नागपंचमीच्या निमित्ताने सासरी नांदणाऱ्या मुलींना माहेरी यायला मिळत असे. माहेरी जाण्याची आस वर्णन करणाऱ्या ओव्यांचा मोठाच साठा आहे.

पंचमीचा सण। नागोबा मी पूजिला।

मुराळी यावा मला। पाठी भाऊ मागितला।

नागपंचमीच्या दिशी। नागाला दूधलाह्या। यावं बहिणीच्या घरी। भाऊराया।

पंचमीच्या सणाच्या वेळी मुलीबाळी आणि मोठ्या बायका भरपूर खेळ खेळतात. कामाच्या रगाड्यातून वेळ काढून एकत्र जमणे, मिळून–मिसळून आनंद साजरा करणे हा यात मुख्य उद्देश असतो. तिन्हीसांजेला सुरू झालेला खेळ उत्तररात्रीपर्यंत चालू राहतो. झिम्मा, फुगडी, फेर, कोंबडा, सूप असे खेळ रंगतात. फुगड्या खेळताना चटकदार उखाणे घेतले जातात.

दारी होती केळ। तिला दिला धपाटा। माझ्यासंग फुगडी खेळतो। नंबरी फुपाटा!

चहा बाई चहा। गवती चहा।

माझ्यासंग फुगडी खेळतो। गणपती पहा।

खटकेदार भाषेत कधी कोपरखळ्या देणारे, कधी खदखदून हसवणारे हे उखाणे विशेष रंगत आणतात. याखेरीज फेराची गाणी आहेत, झिम्म्याची गाणी आहेत, आणखी पुष्कळ प्रकारच्या खेळांची खटकेबाज, भाषालालित्य दाखवणारी गाणी असा नमुनेदार खजिना आहे.

नागपंचमी झाल्यानंतर जो रविवार येतो, त्या दिवशी खानदेशात कानबाईच्या पूजेचा उत्सव असतो. कानबाई हा पार्वतीचा अवतार आहे. कानबाईची प्रतिष्ठापना झाल्यावर रात्री तिथे कानबाईच्या गाण्याच्या बैठकी होतात. ही गाणी आख्यानात्मक असतात, तशीच आध्यात्मिकही असतात. प्रकृती–पुरुष संबंधासारखा आध्यात्मिक विषय या गाण्यात येतो. ही विशिष्ट गाणी गाणारे भाट किंवा शाहीर यासाठी खास बोलावले जातात. निरनिराळ्या गावचे भाट किंवा फड बोलवून त्यांच्यात या गाण्यांची चुरस लावली जाते. एका फडाने गाण्यातून कूटप्रश्न विचारायचा आणि दुसऱ्या फडाने गाण्यातून त्याचे उत्तर द्यायचे, अशी चुरस खूप रंगते. काही ठिकाणी कानबाईचे कन्हेरदेवाशी लग्न लावले जाते. या लग्नावेळी म्हणायची वेगळी गाणी आहेत. अशा एका गाण्यात कानबाईचे वर्णन असे आले आहे –

अहो चैतन्य साडी नेसोन। ब्रह्म काचोळी घातली तिनं। गळ्यात गरसोळी बांधली तिनं।

इला मुखरा साजे। बहु प्रकाश गाजे। अहो हाती एक कंगन बांधुन। जग मोहिला सारा तिनं।।

जग मोहवणारी आदिमाया लग्नास उभी असून खुद्द ब्रह्मा

तिचे पुरुषाशी लग्न लावतो. प्रकृती–पुरुषाच्या या मीलनाने सर्व जगात चैतन्य संचारले आहे, असा या गीताचा आशय आहे.

श्रावण महिन्यातले नवविवाहित मुलींनी करावयाचे व्रत म्हणजे मंगळागौर. लग्नानंतर पहिली पाच वर्षे श्रावणातल्या प्रत्येक मंगळवारी मंगळागौरीची पूजा मोठ्या थाटामाटाने करावयाची पद्धत आहे. स्वत: सजून, देवीला सजवून, पूजा करून हे सौभाग्याचे व्रत केले जाते. पूजेनंतर आरती करून मंगळागौरीची कहाणी वाचली जाते. त्यानंतर खेळ खेळून रात्र जागवली जाते.

विदर्भात भराडी गौर (वऱ्हाडी गौर) या नावाने आणि अतिशय कलात्मक पद्धतीने शंकर–पार्वतीची फुलांनी पूजा बांधण्यात येते. या पूजेच्या गाण्यांचाही खूप मोठा खजिना आहे. या प्रसंगीही रात्री खेळ खेळून रात्र जागवायची पद्धत आहे.

श्रावणातला पुढचा उत्सव म्हणजे नारळी पौर्णिमा व राखीपौर्णिमा. ज्येष्ठ–आषाढात पावसामुळे समुद्रात नावा घातल्या जात नाहीत. श्रावणी पौर्णिमेच्या सुमाराला समुद्र शांत होतो. या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करून त्याचा आशीर्वाद मागितला जातो व त्यानंतर नावांची वाहतूक सुरू होते. नारळी पर्णिमा हा कोळी बांधवांचा मोठा सण आहे. नारळी पौर्णिमेचे वर्णन करणारी भरपूर कोळीगीते आहेत. गाणी गाऊन, नाचून कोळी बांधव नारळी पौर्णिमा साजरी करतात. समुद्रापासून लांब असलेल्या प्रदेशात मात्र श्रावण पौर्णिमा ही भावा–बहिणीच्या नात्याच्या रेशमी बंधाच्या – म्हणजे राखीच्या नावाने ओळखली जाते, साजरी केली जाते.

नारळी पौर्णिमेनंतर येते कृष्ण जन्माष्टमी आणि दुसऱ्या दिवशी दहीहंडी आणि गोपाळकाला. श्रीकृष्णकथा आबालवृद्धांच्या आवडीची असते. पाळणा हलवून, कथा–कीर्तने–भजने करून जन्माष्टमीला कृष्णजन्म साजरा केला जातो. कृष्णलीला सांगणारी असंख्य लोकगीते आहेत. असंख्य काव्ये, कवने त्यावर रचली गेली आहेत.

जलमला कृष्ण अडवा घेतला बापानी।
कवाड कृष्ण उघडी लाथांनी।
आगाशी पाखरू बोलीचा फेर जाना।
उपजला कृष्ण उघडला बंदीखाना।

कृष्णजन्माचे आणि नंतरच्या घटनांचे वर्णन करणारी अशी ओवीगीते गाण्यात स्त्रिया रमून जातात. जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी मंदिरांमधून काल्याचे कीर्तन होते. चौकाचौकात गोपाळ जमवून दहीहंडी साजरी केली जाते. 'गोविंदा आला रे आला'चा ताल रंग भरतो.

श्रावणी अमावास्या ही बैलपोळा किंवा बेंदूर म्हणून साजरी केली जाते. बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी दिवाळीपेक्षाही मोठा सण. बैल सजवण्यासाठी चाळ, कडे, वेसणी, रंग आदी सामान खरेदी केले जाते. बैलांना हळद तेलाने मालिश केली जाते. मग बैल सजवून त्यांची पूजा केली जाते. त्यांना बाजरीचा खिचडा खायला घातला जातो. त्यांची मिरवणूक काढली जाते.

यवतमाळ आणि जवळपासच्या भागात या दिवशी शेतकरी आणि गडीमाणसे 'झडती' गातात. आपल्या आपल्या बैलाचे कौतुक करणारी, त्याच्यावरचे प्रेम दाखवणारी ही झडती गीते अहमहमिकेने, जोरजोरात आणि विशिष्ट तालावर म्हटली जातात आणि शेवटी 'हर हर महादेव' म्हणून आरोळी ठोकली जाते. एका बैलजोडीसाठी एक माणूस, अशी भरपूर गडीमाणसे असतील, तर अशा झडत्यांची जणू स्पर्धाच सुरू होते.

चक चहाडा। बैल बहाडा। बैल गेला पोहनगडा।
पोहनगडची आनली माती।
थे देल्ली गड्याच्या हाती।
गड्यानं देल्ली कुंभाराच्या हाती।
कुंभारानं घडवलं पिंपळपान।
थे देल्लं मालकाच्या हाती।
मालकानं देल्लं गड्याच्या हाती।
गड्यानं लावलं बैलाच्या मस्तकी।
एक नमन गौरा पारबती हरबरा।
हर हर महादेव!

या झडतीत गडी प्रेमाने बैलाला चहाडखोर म्हणतो. बैलाने पवित्र पोहनगडावरची दिव्य माती आपल्या शिंगांनी उकरून आणली. गड्याला दिली. गड्याने कुंभाराला दिली. कुंभाराने त्या दिव्य मातीचे पिंपळपान घडवले आणि मालकाला दिले. मालकाने ते गड्याला दिले. गड्याने ते बैलाच्या कपाळावर शोभून दिसेल असे लावले. म्हणजे बैल असा असा सजवला. अशा पुष्कळ झडत्या गायल्या जातात. हा एक वेगळाच लोकाविष्कार आहे.

अमावास्येबरोबर श्रावण संपतो आणि चाहूल लागते ती गणराजाच्या आगमनाची. भाद्रपद चतुर्थीला घरोघरी गणेशाच्या पार्थिव मूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते आणि मोठ्या धूमधडाक्यात उत्सवाला सुरुवात होते. पूजा, आरत्या, गाणी, कार्यक्रम यांचा दणका सुरू होतो. गणेश हा सगळ्यांच्या लाडका देव. त्याला अग्रपूजेचा मान असतो. कुठल्याही कामाला सुरुवात करताना त्याची आठवण केली जाते. त्याची

कहाणीसुद्धा सर्वतोमुखी असते. 'निर्मळ मळे, उदकाचे तळे, बेलाचा वृक्ष, सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळे राउळे ' अशी तालात गात गात 'मनचा गणेश मनी वसावा' हा संदेश देते. दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस, अकरा दिवस चालणारा, भरगच्च कार्यक्रमांचा हा उत्सव आबालवृद्ध मनसोक्त साजरा करतात आणि तरी सरतेशेवटी गजाननाला निरोप देताना कातर होतात.

आपले सण, उत्सव आपल्या भावभावनांचेच मूर्त रूप घेऊन येतात. इथे भाव आणि भक्ती यांचे अद्वैत प्रत्ययाला येते. भारतीय वृत्ती ही आनंद साजरा करणारी, सजणारी, सजवणारी, रंगतदार अशी आहे. ती या सण-उत्सवांतून दिसून येते. निसर्गात देव पाहणारी, अव्यक्त परब्रह्माला एकाच नाही, तर अनेक व्यक्त रूपांत पाहणारी आणि त्या व्यक्त रूपांना मानवी पातळीवर आणून त्यांची उपासना करणारी अशी आपली संस्कृती आहे. त्यामुळेच गणेशोत्सवात 'गौरी आगमन', 'गौरीपूजन' या प्रथांतून घरोघरी या दैवतांचे चक्क माहेरपण केले जाते. स्वत:च्या लेकीचे ज्या कोडकौतुकाने माहेरपण करावे, त्यापेक्षा अधिक भावनेने आणि श्रद्धेने त्या ईश्वरी रूपाचे माहेरपण केले जाते. या प्रसंगीच्या भावभावनांचे प्रकटीकरण लोकगीतातून पुष्कळ प्रकारे झालेले दिसते.

'आली गौराई अंगणी। तिला लिंबलोण करा' म्हणत दृष्ट काढून या गौरीचे स्वागत केले जाते.

'सोनियाच्या पावलांनी गवर आली माहेरा।
रानंमाळ हिंडली ग भाजी भाकर जेवली।'

मग तिला नैवेद्य दाखवला जातो.

'गौराय पावनी ये ग दोन रातरा।
पाची परकाराची भाजी करते जेवायाला।
दूध पोळी खा ग शेवाया बोटवं।
वाढा जेवायाला शंकर जावायाला।'

गौर ही लेक म्हटल्यावर शिवशंकर हा जावईच झाला. मग त्याला मानाचे पान वाढले जाते.

आला भादवा महिना। गवर लेकीला आणा।
आली गवराई घरात। सडा रांगोळी दारात।
झाला आनंद गगनात। वाजवा भानूर जोसात।
आली गौराई अंगणी। दोन दिसांची पावणी।
इंद्रराजाची म्हेवणी। शंक्रूबाची कांता।
गजाननाची माता। हिमगिरी तिचा पिता।
वट्या भरा जाता जाता। दहिभात देती हाता।

अशी तिसऱ्या दिवशी या माहेरवाशिणीची ओटी भरून पाठवणी केली जाते. गौरी-गणेशोत्सवाच्या सांगतेबरोबरच श्रावण-भादव्याच्या उत्सवी पर्वाची समाप्ती होते. मनामनात तृप्तीची भावना असते. आला दिवस कोरेपणाने ढकलण्यापेक्षा किंवा अशांत मनोवृत्तीने जगण्यापेक्षा देवासह समाधानाने जगण्याची ही कला फक्त आणि फक्त भारतीय हिंदू संस्कृतीत आहे. अशा प्रकारे परमतत्त्वाचा अथवा चैतन्याचा साक्षात्कार झालेल्या आपल्या संस्कृतीने आपल्या दैनंदिन आयुष्याशी त्याच चैतन्याची सोबत जोडली आहे. आणि म्हणूनच अंत:स्फूर्तीने आणि सहजभावाने इथे लोकसाहित्य आणि कला यांची उपज झाली आहे.

लोकपरंपरेतून पुढे आलेले कहाण्या, जात्यावरच्या ओव्या, खेळांची गाणी, हादग्याची गाणी, बैलपोळ्याच्या झडत्या हे साहित्यप्रकार म्हणजे महाराष्ट्राचा आत्मा आहेत. मुद्दाम रचायचे म्हणून हे रचलेले नाहीत. सहजपणे स्फुरलेले, भावना स्पष्टपणे व्यक्त करणारे, प्रसंगी मनात साचलेल्या गोष्टींचा निचरा करणारे असे हे साहित्यप्रकार आहेत. यात कसलाही अभिनिवेश नाही. त्यामुळे ते अस्सल आहेत. खरे आहेत.

आज बदललेल्या काळात काही परंपरा बंद पडल्या, काही नवे रूप घेऊन पुढे आल्या. पण या परंपरांच्या निमित्ताने लोकसाहित्याची जी नवनिर्मिती होत होती, तो सहजस्फूर्त झरा मात्र आटत गेला. जुन्या पिढ्यांनी जपलेले, वाढवलेले लोकसाहित्याचे मौखिक शब्दांकन हे सर्व संचितही कालौघात हळूहळू लोप पावले असते. पण डॉ. रा.चिं. ढेरे, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. तारा भवाळकर अशा ऋषितुल्य विद्वानांच्या प्रयत्नांमुळे, त्यांनी घेतलेल्या कष्टांमुळे या मौखिक भांडाराचे लिखित संग्रह आज उपलब्ध आहेत. त्याबद्दल समाजाने या विद्वानांचे ऋणी राहायला हवे.

**सरसरता साहित्य पत्रिकेसाठी लिहिते व्हा...**

आपल्या कथा, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इ. साहित्य समरसता साहित्य पत्रिकेत प्रकाशित करू शकता. आपले साहित्य संपादक समरसता साहित्य पत्रिका १/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई - ७८ या पत्त्यावर पाठवावे.




# सत्त्व अन् स्वत्व जपणारं साकेत प्रकाशन

**कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या बिकट परिस्थितीत सर्वच प्रकाशकांचे व्यवसाय अडचणीत आले. काहींचे व्यवसाय बंद झाले. मात्र साकेतसारख्या तरुण, तडफदार, जिद्दी प्रकाशकाने जागतिक बाजारपेठेचा आणि नवतंत्रज्ञानाचा अभ्यास करून डिजिटल माध्यमाचा कुशलतेने वापर केला. कोरोना संकटात सापडलेल्या प्रकाशन व्यवसायाला नवसंजीवनी दिली. ऑनलाइन प्लॅटफॉर्म, प्रगत तंत्रज्ञान आणि प्रकाशन व्यवसाय यांची सांगड घातली. साकेत प्रकाशनाच्या पुस्तकांना राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठेत आणलं. त्यातूनच साकेत प्रकाशनाच्या कक्षा रुंदावत गेल्या.**

**प्रा.डॉ. नरेंद्र पाठक**
९१६७४०६०५०

मानवी आयुष्यात वयाची पन्नास वर्षं पूर्ण करणं या घटनेला तसं फारसं महत्त्व नाही, मात्र एखाद्या संस्थेने पन्नास वर्षं पूर्ण करणं हे अत्यंत महत्त्वाचं आणि दखल घेण्यासारखं आहे. संस्थाबांधणीमध्ये सामूहिकता, सातत्य आणि त्यातून साध्य होणारी उद्दिष्टपूर्ती या बाबींमुळे एखाद्या संस्थेने पाच दशकांचा प्रवास, तोही चढत्या आलेखाप्रमाणे पूर्ण करणं याची दखल घेणं आवश्यक आहे. त्यातही ती संस्था व्यवसाय आणि सामाजिक बांधिलकी जपणारी असेल, तर त्या यशाची झळाळी अधिकच तेजस्वी वाटते. अशा सर्व निकषांवर साहित्यक्षेत्रात प्रकाशन व्यवसाय सांभाळणारी आणि साहित्यिक बांधिलकी जपणारी प्रकाशन संस्था म्हणजे छत्रपती संभाजीनगर येथील 'साकेत प्रकाशन'. एकीकडे तंत्रज्ञानामुळे प्रकाशन व्यवसायापुढे अनेक आव्हानं उभी राहिली आहेत, तर दुसरीकडे वाचन संस्कृतीपुढील प्रश्नचिन्ह, व्यवसायातील स्पर्धा अशा कात्रीत एकूणच प्रकाशक आणि प्रकाशन संस्था सापडलेल्या असताना साकेत प्रकाशनाची पन्नास वर्षांची वाटचाल लक्षवेधी आहे.

महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक श्री. बाबा भांड हेच खरं तर साकेत प्रकाशाचे 'सर्वेसर्वा', मात्र आपल्या अनुभवकथनात बाबा भांड त्यांचं हे 'सर्वेसर्वापण' नाकारतात. 'साकेत प्रकाशन हे माझं नाही, तर ज्या हजारो लेखकांनी साकेत प्रकाशनावर विश्वास टाकला, साकेत प्रकाशनासाठी लिहिलं, त्या सर्वांचं साकेत प्रकाशन आहे' असं श्री. बाबा भांड सांगतात. वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी 'लागेबांधे' हे पुस्तक लिहिलं होतं आणि कुणीच प्रकाशक मिळेना, अशा वेळी

स्वत:चं पुस्तक स्वत:च प्रकाशित करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. ‘गरज ही शोधाची जननी असते’. त्यातही वडिलांचं छत्र हरवलेलं. अशा परिस्थितीत स्वत:च्या अडचणीवर स्वत:च उत्तर शोधावं अशा जिद्दीने त्यांनी १९७५मध्ये ‘धारा प्रकाशन’तर्फे स्वत:चं पुस्तक प्रकाशित केलं. प्रकाशनाच्या व्यवसायातील प्रकाशकांच्या अपेक्षा, व्यवहार, व्यवसाय आणि नवलेखकांना मिळणारं स्थान या सर्व गोष्टींचा अनुभव त्यांनी घेतला आणि स्वत:च्या अनुभवविश्वातून आपल्या लेकीच्या नावाने धारा प्रकाशनाची स्थापना केली. बाबा स्वत: लेखक असल्याने आणि साहित्यक्षेत्रातील सगळ्यांशीच व्यापक संपर्क असल्याने माणूस जोडण्याचं काम ते करत गेले. त्यांच्या स्वभावामुळे साहित्यक्षेत्राचा त्यांचा परीघ विस्तारत गेला. त्यांनी अनेक लेखक जोडले.

पुढे १९८०मध्ये त्यांनी आपल्या मुलाच्या – म्हणजे साकेतच्या नावाने धारा प्रकाशनाचं नामकरण केलं. ‘धारा प्रकाशन’ हे ‘साकेत प्रकाशन’ म्हणून लोकप्रिय झालं. बाबा भांड यांनी आरंभीच्या काळात प्रचंड काम केलं. स्वत:च्या लेखनाबरोबर अनेक लेखकांना लिहितं करत गेले. कथा, कविता, ललित, वैचारिक, विज्ञान, पर्यावरण, कादंबरी अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांनी पुस्तकं प्रकाशित केली. अनुवादित साहित्यही प्रकाशित केलं. त्यांच्या स्वत:च्या आणि साकेत प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या काही पुस्तकांना राष्ट्रीय व राज्य पुरस्कारही मिळाले आहेत. काही पुस्तकांना आणि लेखकांना साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. व्यवसाय विस्तारत गेला, लोकप्रियता वाढत गेली, वाचकवर्गही विस्तारत गेला आणि १९९०–९२च्या काळात साकेत प्रकाशन ‘प्रायव्हेट लिमिटेड’ झालं.

पुढे २००१मध्ये बाबा भांड यांनी आपला मुलगा आणि सून म्हणजेच साकेत व प्रतिमा भांड यांच्याकडे व्यवसायाची सूत्रं सुपुर्द केली आणि स्वत:ला लेखनाच्या, संशोधनाच्या कामात गुंतवून घेतलं. त्यातूनच पुढे महाराज सयाजीराव गायकवाड चरित्र ग्रंथ व ग्रंथसंपदा असा भव्य प्रकल्प महाराष्ट्र शासनाच्या मदतीने पूर्णत्वास गेला. महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या आयुष्यावर संशोधन करून साठ हजार पानांचं लेखन करणं हे शिवधनुष्यच होतं. या कामाचं श्रेय कळत–नकळत, अप्रत्यक्षरीत्या साकेत प्रकाशनाकडे जातं, कारण साकेत प्रकाशनामुळेच लेखक, संशोधक, प्रकाशक म्हणून बाबा भांड घडत गेले. आज महाराष्ट्रातील नामवंत लेखकांची २२०० पुस्तकं साकेत प्रकाशनाने प्रकाशित आणि वितरित केलेली आहेत. १०८३ लेखक साकेत प्रकाशनाच्या परिवारात आहेत. साकेत प्रकाशनाच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीत आवर्जून उल्लेख करायचा झाल्यास ‘नवसाक्षरता अभियानाचा’ उल्लेख करणं उचित ठरेल. महाराष्ट्र शासनातर्फे राज्यस्तरावर नवसाक्षरता अभियानाअंतर्गत अनेक पुस्तकं प्रकाशित केली जातात. या अभियानाअंतर्गत साकेत प्रकाशनाच्या ७० पुस्तकांना पुरस्कार मिळालेले आहेत. तसंच महाराष्ट्र शासनातर्फे उत्कृष्ट प्रकाशक म्हणून दिला जाणारा पुरस्कारही २०१९मध्ये साकेत प्रकाशनाला मिळालेला आहे.

कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या बिकट परिस्थितीत सर्वच प्रकाशकांचे व्यवसाय अडचणीत आले. काहींचे व्यवसाय बंद झाले. मात्र, साकेतसारख्या तरुण, तडफदार, जिद्दी प्रकाशकाने जागतिक बाजारपेठेचा आणि नवतंत्रज्ञानाचा अभ्यास करून डिजिटल माध्यमाचा कुशलतेने वापर केला. कोरोना संकटात सापडलेल्या प्रकाशन व्यवसायाला नवसंजीवनी दिली. ऑनलाइन प्लॅटफॉर्म, प्रगत तंत्रज्ञान आणि प्रकाशन व्यवसाय यांची सांगड घातली.

**– प्रा.डॉ. नरेंद्र पाठक**

कोरोनासारख्या जागतिक महामारीच्या बिकट परिस्थितीत सर्वच प्रकाशकांचे व्यवसाय अडचणीत आले. काहींचे व्यवसाय बंद झाले. मात्र साकेतसारख्या तरुण, तडफदार, जिद्दी प्रकाशकाने जागतिक बाजारपेठेचा आणि नवतंत्रज्ञानाचा अभ्यास करून डिजिटल माध्यमाचा कुशलतेने वापर केला. कोरोना संकटात सापडलेल्या प्रकाशन व्यवसायाला नवसंजीवनी दिली. ऑनलाइन प्लॅटफॉर्म, प्रगत तंत्रज्ञान आणि प्रकाशन व्यवसाय यांची सांगड घातली. साकेत प्रकाशनाच्या

पुस्तकांना राष्ट्रीय आणि जागतिक बाजारपेठेत आणलं. त्यातूनच साकेत प्रकाशनाच्या कक्षा रुंदावत गेल्या. सकस, दर्जेदार साहित्य आणि गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता मराठीबरोबरच हिंदी, इंग्लिश भाषांतील पुस्तकंदेखील साकेत प्रकाशनातर्फे प्रकाशित केली जाऊ लागली. क्रॉसवर्डच्या, ॲमेझॉनच्या माध्यमातून ऑनलाइन पुस्तक विक्रीचं, वितरणाचं कौशल्य साकेत प्रकाशनाने आत्मसात केलं. नव्या-जुन्याची सांगड घालून साकेत प्रकाशनाने अर्धशतकाची वाटचाल पूर्ण केली आहे.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सूत्रं हस्तांतरित झाली आहेत. या सगळ्या वाटचालीत केवळ व्यवसाय नव्हे, तर त्यापलीकडे सामाजिक व साहित्यिक बांधिलकी रुजवण्याचं कामही साकेत प्रकाशनाने केलं आहे. व्यावसायिकता आणि साहित्यिक बांधिलकी याची उत्तम सांगड म्हणजे साकेत प्रकाशन अशी ओळख निर्माण करण्यात व रुजवण्यात भांड परिवाराला यश प्राप्त झालेलं आहे. यामागे पन्नास वर्षांचा संघर्ष आणि साहित्यनिष्ठा आहे. साकेत प्रकाशनाच्या पुस्तकांमध्ये केवळ सामाजिक, ऐतिहासिक, ग्रामीण विषयांची पुस्तकं नसून अध्यात्म आणि राष्ट्रीय विचारांची पुस्तकंही मोठ्या प्रमाणात प्रकाशित केली जातात. पुस्तक छपाईचा निर्णय घेताना केवळ आर्थिक निकष न लावता जीवनमूल्यं, मूल्यसंस्कार, सामाजिक जाणीव, संवेदना, चारित्र्यनिर्मिती, राष्ट्रीय विचार अशा निकषांवर पुस्तकांची निवड केली जाते. व्यावसायिकता जपत असताना समाजातील व राष्ट्रातील 'स्वत्व' आणि 'सत्त्व' टिकवणाऱ्या साहित्याची निर्मिती करणाऱ्या साकेत प्रकाशनाच्या सुवर्णमहोत्सवी आनंदोत्सवासाठी माझ्या







# मसणजोगी समाज

भाग २

मसणजोगी समाज हा भगवान शंकराचा भक्त आहे. यल्लमादेवीलासुद्धा हा समाज मोठ्या प्रमाणात मानतो. वर्तमानामध्ये सर्व मसणजोगी समाजाच्या वस्तीमध्ये पूज्य रामबाबांचे मंदिर आढळते. मंदिरामध्ये एकूण तीन ते चार मूर्ती असतात. त्यामध्ये रामबाबा, त्यांची आई व भाऊ व वहिनी यांच्या मूर्ती असतात. रायगड जिल्ह्यातील खोपोली या शहरापासून दोन किलोमीटरवर घाटामधील एका पहाडावर पू. रामबाबा यांची समाधी आहे. संपूर्ण समाज प्रत्येक गुरुपौर्णिमेला पूज्य रामबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी जात असतो.

**राहुल चव्हाण**
८१४९२०१२१४

गावगाड्याबाहेर राहणारा मसणजोगी समाज नेहमीच दुर्लक्षित राहिला आहे. त्यांच्या विविध प्रथा–परंपरासुद्धा मुख्य प्रवाहात येण्यास अडसर ठरल्या आहेत. स्मशानघाटामध्ये राहून प्रेतांवर अंतिम संस्कार करणारा हा समाज कट्टर शिवभक्त आहे. महादेवाच्या नावाने भिक्षा मागणारा, राजा हरिश्चंद्राशी संबंध सांगणारा हा समाज मात्र मागासलेलाच राहिला आहे. आपल्या चालीरितींमुळेच नेहमी वैशिष्ट्यपूर्ण दिसणारा, जन्म–मृत्यू, लग्न, देवकार्य या प्रथा–परंपरा या समाजाचे वेगळेपण दर्शवितात.

**जमातीतील कुळे व दैवत**

मसणजोगी समाजात त्यांच्या कामाच्या स्वरूपावरून कुळाची विभागणी झाली आहे. प्रत्येक कुळामध्ये देवदेवतांची विभागणी झाली आहे. देवदेवतांचे नैवेद्यसुद्धा वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. कुळाच्या नावावरून देवदेवतांची ओळख आणि देवदेवतांच्या नावावरून कुळाची ओळख असे समीकरण मसणजोगी समाजामध्ये आहे.

| **कुळाचे नाव** | **दैवत** |
|---|---|
| कडमिंचे | – वेताळस्वामी |
| शेंडरे | – भुलचम्मा |
| मोरे | – म्हसोबा |
| उबदे | – भगवान शंकर |
| लासुरे | – यल्लमादेवी |
| संकोड | – दुर्गामाता |
| मामडे | – यल्लमा |
| टेकोडे | – यल्लमा |

| | |
|---|---|
| कापरे | – खंडोबा |
| शिरगिरे | – बालाजी (आंध्र प्रदेश) |
| बाजोड | – सकलारी बाबा |
| कल्ल्यामोड | – कोशोम्मातल्ले |
| थिरनालोड | – गंगाम्मा |
| पत्र्योड | – गंगाम्मा |
| कोंडाबिलोड | – गंगाम्मा |
| सितारे | – गंगाम्मा |

कोणत्या कुळाने कोणत्या कुळाशी सोयरेसंबंध ठेवावे, यांचे अलिखित नियम मसणजोगी समाजात आहेत व ते आजसुद्धा टिकून आहे. एखाद्या कुळाने अजाणतेपणे किंवा अपघाताने नियम मोडण्याचा प्रयत्न केला, तर जात पंचायत त्या कुळाला शिक्षा करते. अशा कुळांना जाती बाहेर टाकण्याचीसुद्धा परंपरा आहे.

**जन्म, लग्न व मृत्यू विधी**

पूर्वीच्या काळी या जमातीमध्ये गरोदर स्त्रियांच्या पोटाला कुंकू लावून विवाह निश्चित केला जात असे. परंतु नंतर काळाच्या प्रवाहात ही प्रथा बंद पडली. मसणजोगी समाजातील विवाह तीन दिवस चालतो. सर्व पाहुणे विवाहघरी मुक्कामी असतात. त्यांच्या जेवणासाठी लग्नसंबंधातील सोयरे प्रत्येकी ५ रुपये याप्रमाणे वर्गणी जमा करतात. जमलेल्या पैशांमधून डाळ, तांदूळ आणि चिंचा खरेदी करून जेवणाचा बेत केला जातो. डाळभात व चिंचेची कढी हेच लग्नातील मुख्य जेवण मानले जाते. लग्नाचा पहिला दिवस देवकार्याचा मानला जातो. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी हळदीचा कार्यक्रम व तिसऱ्या दिवशी लग्नविधी पार पाडले जातात. मसणजोगी समाजात विवाहप्रसंगी मृत व्यक्तीच्या अंगावर पांघरलेल्या शालीचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. विवाहप्रसंगी ही शाल वापरणे (मांडवासाठी) शुभ मानले जाते. या मांडवातील लग्न यशस्वी होतात, असा समज या जमातीमध्ये पूर्वीपासून आहे.

महाराष्ट्रामधील भटके विमुक्त समाजात दारूचे खूप महत्त्व आहे, याला मसणजोगी समाजसुद्धा अपवाद नाही. मसणजोगी समाजामधील लग्न, मृत्यू व देवकार्य दारूशिवाय पूर्ण होत नाही. लग्नकार्याच्या व मयताच्या प्रसंगी दारू पाजणे हा जमातीचा रिवाज मानला जातो. प्रेतास स्मशानघाटात अंत्यसंस्कारासाठी नेल्यानंतर जमलेल्या लोकांना दारू दिली जाते. दारू प्यायल्यानंतर मृतांचे अंत्यसंस्कार पार पाडले जाते. लग्न, मृत्यू, देवकार्यात दारू न पाजणे हा गुन्हाच मानला जातो. वेळप्रसंगी जात पंचायतमध्ये जाब विचारून दंड करण्याचीसुद्धा पद्धत मसणजोगी समाजात आहे. मसणजोगी समाजात डुकराला खूप महत्त्वाचे स्थान आहे. त्याच्या मटणाची पंगत देण्याची प्रथा या समाजात खूप आधीपासून आहे. देवकार्यात प्रत्येक कुटुंबात डुक्कर कापून देवाचा प्रसाद म्हणून जमातीतील प्रत्येक कुटुंबात डुकराचे मटण दिले जाते. असे केले नाही, तर जात पंचायतमध्ये तक्रार केली जाते.

**पूज्य रामबाबा**

मसणजोगी समाज हा भगवान शंकराचा भक्त आहे. यल्लमादेवीलासुद्धा हा समाज मोठ्या प्रमाणात मानतो. वर्तमानामध्ये सर्व मसणजोगी समाजाच्या वस्तीमध्ये पूज्य रामबाबांचे मंदिर आढळते. मंदिरामध्ये एकूण तीन ते चार मूर्ती असतात. त्यामध्ये रामबाबा, त्यांची आई व भाऊ व वहिनी यांच्या मूर्ती असतात. रायगड जिल्ह्यातील खोपोली या शहरापासून दोन किलोमीटरवर घाटामधील एका पहाडावर पू. रामबाबा यांची समाधी आहे. संपूर्ण समाज प्रत्येक गुरुपौर्णिमेला पूज्य रामबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी जात असतो.




मसणजोगी समाजाची अशी श्रद्धा आहे की याच ठिकाणी रामबाबांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर रामबाबांनी आपल्या आईला स्वप्नात दृष्टान्त देऊन सर्व हकिकत सांगितली. आईने प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन बघितल्यावर तिथे रामबाबांचे शव सापडले. त्यानंतर त्या शवावर त्या पहाडावर रीतसर अंतिम संस्कार करण्यात आले, ती ही जागा. आज त्या ठिकाणी एक



छोटे मंदिर व रामबाबांची मूर्ती आहे. भाविक मोठ्या श्रद्धेने त्यांचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. फक्त मसणजोगी समाजच नव्हे, तर तिरमल, नंदीबैलवाले, मरीआईवाला समाज, कडकलक्ष्मी इत्यादी समाजसुद्धा रामबाबांचा भक्त आहे. पूज्य रामबाबांना मनोभावे प्रार्थना केली, तर बाबा आपली इच्छा पूर्ण करतात अशी श्रद्धा समाजामध्ये आहे. मसणजोगी समाजात या संदर्भात अनेक घटना ऐकण्यास मिळतात. घोडेगावचे भरत फुलमाई, सिल्लोडमधील साहेबराव शिंदे, शेवगाव येथील गोविंदा कडमिंचे यांच्याकडून अशा अनेक घटना ऐकण्यास मिळतात. यामुळेच आज आपणास मसणजोगी समाजवस्तीमध्ये पूज्य रामबाबांचे मंदिर दिसते.

**जात पंचायत**

भटके विमुक्त समाजाप्रमाणेच आजसुद्धा मसणजोगी समाजात जात पंचायतीचे वर्चस्व दिसते. जात पंचायतीच्या प्रमुखास सरपंच असे म्हणतात. सरपंचाला (जात प्रमुखाला) मदत करण्यासाठी पाच सभासद असतात. एकूण सहा सभासदांची जात पंचायत बनते. लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील लक्ष्मण मुकुटमोरे हे या समाजातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आहेत. मसणजोगी समाजात जात पंचायतीला खूप मानसन्मान असतो. त्याचबरोबर त्यांचा समाजामध्ये दरारासुद्धा असतो. कुटुंबातील लग्नकार्य, देवकार्य, बाळाची पाचवी, अंतिम संस्कार अशा प्रसंगी जात पंचायतीची उपस्थिती आवश्यक असते. मसणजोगी समाजात जात पंचायत ही फक्त पुरुषांची न्यायव्यवस्था मानली जाते. पंचायतीमध्ये महिलांना कोणतेही स्थान दिले जात नाही. विशेष म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी बैठक असेल, तर महिला बैठकीत उपस्थित राहू शकतात, पण त्यांना चर्चा करता येत नाही. एखाद्या महिलेवर आरोप असेल तर तिचा नवरा, वडील किंवा भाऊ बाजू मांडतात, परंतु महिलांना आपली बाजू मांडण्याचे स्वातंत्र्य जात पंचायतीमध्ये नाही. मसणजोगी समाजात जात पंचायत कोणत्या गुन्ह्यासाठी दंड करू शकते, अशा ३१ कारणांची सूची प्रा. रामनाथ चव्हाण यांनी त्यांच्या 'भटक्या-विमुक्तांची जात पंचायत - खंड चार' या पुस्तकात दिली आहे. त्यामध्ये जमातीच्या व्यक्तीस आईवरून शिवी देणे, अन्य जातीजमातीतील मुलगी पळवून आणणे, लग्नसोहळ्यात बँड वाजवणे, मातंग जातीच्या व्यक्तीच्या हातचे किंवा घरचे पाणी पिणे, मुसलमान व्यक्तीच्या घरचे अन्न खाणे, पोलीस चौकीमध्ये तक्रार नोंदणी इत्यादी कारणांचा समावेश आहे. काळाच्या प्रवाहात मसणजोगी समाजात अनेक बदल झाले आहेत. त्याचप्रमाणे जात पंचायत व्यवस्थेमध्येसुद्धा बदल झाले आहेत. दिवसेन्‌दिवस या जात पंचातीचा प्रभाव कमी होत आहे. काही ठिकाणी तरुण मंडळी जात पंचायतीमधील अन्यायाविरोधात आवाज उठविताना दिसतात. या तरुणांनी समाजातील अनेक प्रथा-परंपरांमध्येसुद्धा बदल केला आहे.

**प्रश्न व समस्या**

समाजाच्या परंपरागत व्यवसायात - मग तो भिक्षा

मागणे असो की स्मशानघाटात अंतिम संस्कार करण्याचे काम असो, यात बऱ्याच प्रमाणात परिवर्तन झाले आहेत. आता अधिकांश समाज भंगार जमा करण्याचा व्यवसाय करतो. या व्यवसायात पैसा मिळतो, पण या व्यवसायामुळे अनेक समस्या व प्रश्न निर्माण झाले आहेत. दिवसभर भंगार व अस्वच्छ वातावरणामुळे आरोग्याचा मोठा प्रश्न या समाजात निर्माण झाला आहे. त्याचबरोबर दारूचे व्यसन व त्यामध्येसुद्धा किशोरवयीन मुलांमध्ये दारूचे व्यसन ही एक समाजापुढील मोठी समस्या आहे. भंगारामधून कमी वयात पैसे मिळत असल्यामुळे किशोर व तरुण मुलांमध्ये शिक्षणाची आवड दिसत नाही. परिणामत: शिक्षण घेण्याचे प्रमाण समाजात कमी आहे. त्यामुळे नोकऱ्यांमध्येसुद्धा या समाजाचे प्रतिनिधित्व दिसत नाही. या समाजात ख्रिश्चन मिशनऱ्यांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झाला आहे. जागोजागी त्यांच्या समस्यांचा, अज्ञानाचा, गरिबीचा फायदा घेऊन त्यांचे धर्मांतर केल्याचे दिसते. प्रामुख्याने लातूर, नाशिक, शेवगाव, पुणे या भागात धर्मांतराचा प्रभाव दिसतो. या समाजातील जाणकार व सामाजिक कार्यकर्त्यांनी यामध्ये वेळीच लक्ष दिले नाही, तर धर्मांतर ही भविष्यात एक मोठी समस्या बनेल.

२००१मध्ये मसणजोगी समाजात 'चलो बुद्ध की ओर' या चळवळीने जोर धरला. ही संपूर्ण चळवळ राजकीय होती. लोकांच्या समस्या, प्रश्न व अज्ञान यांचा फायदा घेऊन आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी ही चळवळ उभी केली गेली. या चळवळीमुळे मसणजोगी समाजाच्या जीवनात काही बदल झाला नाही. कुठेही कागदपत्रे मिळाली नाहीत, योजनांचा लाभ मिळाला नाही, आर्थिक उन्नती झाली नाही किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनात कुठलेही परिवर्तन झाले नाही. परंतु काही नेत्यांचे मात्र राजकीय पुनर्वसन झाले. याबाबत लेखक डॉ. धोंडीराम वाडकर आपल्या 'मसणजोग्याचे लोकजीवन' या पुस्तकात लिहितात – 'मी व माझे दोन विद्यार्थी क्षेत्रीय अभ्यासासाठी शेवगावात अनेक वेळा गेलो, पण एकाही मसणजोगी जमातीतील व्यक्तीने जय भीम असे म्हटले नाही, उलट रामराम, नमस्कार हेच त्यांनी म्हटले. गल्लोगल्ली त्यांचे आराध्य दैवत रामबाबांची मंदिरे दिसली. उलट घरातही राम, सीता, दुर्गामाता, रेणुकामाता, यल्लमादेवी यांचे फोटो घरोघरी दिसून आले. मी अनेकांना प्रश्न विचारले की तुम्ही बौद्ध धर्म का स्वीकारला? त्यातले काही लोक म्हणत होते की लोकांच्या सांगण्यावरून आम्ही स्वीकारला, पण परत आम्ही पूर्वीच्या देवदेवतांचे पूजन करतो, असे त्यांनी सांगितले. आजही तुम्ही पाहिले, तर राम, सीता, रामबाबा यांची मंदिरे दिसतात, त्यामुळे मसणजोग्यात हा बदल दिसून येत नाही. आपला राजकीय, आर्थिक हेतू साध्य करण्यासाठी अनेक लोक या प्रकारच्या अनेक चळवळी चालवतात. समाजाने या संबंधांमध्ये जागृत राहण्याची आवश्यकता आहे.

**समाजाच्या विकासामध्ये परिषदचे योगदान**

भटके विमुक्त विकास परिषद या समाजाच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. भटके विमुक्त समाजात शिक्षण, आरोग्य, सन्मान, सुरक्षा हे चार बिंदू घेऊन परिषद कार्य करीत आहे. मसणजोगी समाजातील मुले–मुली शिकावी, ती प्रमाण शाळेत जावी, त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी यासाठी परिषदेमार्फत 'पालावरची शाळा' हा अभिनव उपक्रम चालविला जातो. निलंगा, किल्लारी, उमरगा, धाराशिव, तुळजापूर, लातूर इत्यादी ठिकाणी या प्रकल्पामार्फत शिक्षणगंगा या वस्तीवर पोहोचविण्याचे कार्य परिषद करीत आहे. गावगाड्याबाहेर राहणाऱ्या समाजाला हिंदू समाजाने आपला बंधू म्हणून जवळ करण्याचे प्रयत्न सर्वत्र होताना दिसत आहेत. २२ जानेवारी २०२४ रोजी आयोध्या येथे प्रभू रामचंद्राच्या भव्य मंदिरामध्ये प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला. देशातील मान्यवर लोकांना मंदिर संस्थानकडून सन्मानपूर्वक निमंत्रण दिले गेले. मसणजोगी समाजाचे हिंदू धर्मातील योगदान लक्षात घेता राम मंदिर ट्रस्ट, अयोध्या यांनी या समाजाला या कार्यक्रमाला बोलविण्याचा निर्णय घेतला. मसणजोगी समाजातील सामाजिक कार्यकर्ते चाकूर येथील श्री. लक्ष्मणजी मुकुटमोरे यांना या कार्यक्रमाचे सन्मानपूर्वक निमंत्रण दिले गेले. लक्ष्मणजी मुकुटमोरे हे या कार्यक्रमास सहभागी झाले. तेथील प्रेमपूर्वक वागणूक, आत्मीयतापूर्वक व्यवहार व सन्मान बघून संपूर्ण समाज गहिवरून गेला. 'अवघा हिंदू बंधू बंधू' याचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना या कार्यक्रमात झाले. परिषदेमार्फत मसणजोगी समाजातील लोकांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. या समाजातील लोकांना मूलभूत कागदपत्रे मिळवून देण्यासाठी विविध वस्त्यांमध्ये परिषदेमार्फत शासकीय कागदपत्र वाटप शिबिरे आयोजित केली गेली. परिणामत: अनेक लोकांना पहिल्यांदाच जन्मदाखला, जातदाखला मिळाला. हे कार्य कुठल्या एखाद्या संस्था–संघटनेकडून होणे अशक्य आहे. त्यासाठी समाजातील संघटना, शासन–प्रशासन, सामाजिक नेतृत्व यांनी समन्वयातून काम करण्याची आवश्यकता आहे, तरच मसणजोगी समाज मुख्य प्रवाहात सामील होईल.

**महाराष्ट्र प्रांत प्रमुख**
**भटके विमुक्त विकास परिषद**




# बंदिशाळा

**नासिकमध्ये सावरकरांच्या अनेक सभा झाल्या. विविध सण-समारंभातही त्यांची भाषणे झाली. प्रत्येक ठिकाणी त्यांनी सुधारणा, अस्पृश्यता व जातिभेद निवारण, हिंदू संघटन, स्त्रियांचे सक्षमीकरण या मुद्द्यांवर भर दिला. तरुणांनी माझ्या स्तुतीसाठी काव्ये रचित बसण्यापेक्षा माझ्यापेक्षाही मोठा पराक्रम करावा असा उपदेश ते प्रत्येक तरुणाला करत.**

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

९९६७७९६२५४

### प्रकरण तिसरे – पुन्हा अटक?

''जय माता दी, जोर से बोलो.. जय माता दी!'' देवीचा जयजयकार सगळीकडे घुमत होता. रथावर आरूढ देवीची मूर्ती फुलांनी सजली होती आणि ढोल-ताशांच्या गजरात लोक बेभान होऊन नाचत होते. मिरवणुकीत सामील झालेले लोक, लहान मुलं, बायका, वृद्ध सगळे आनंदात मग्न होते. ही मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यावर गर्दी जमली होती. राधा या नुकत्याच वयात आलेल्या तरुणीने देवीच्या पायांवर फुलं वाहिली. तिच्या शेजारी असलेली तिची गरोदर मैत्रीण शांता म्हणाली, ''राधा, मातेची कृपा आपल्यावर आहे.'' राधाने स्मित केलं, ''हो, आज सगळं शुभ होईल.'' शांताने आपल्या पोटावरून हात फिरवला आणि नमस्कार करत देवीला म्हणाली, ''मां, आज ते येताहेत. गेली सहा महिने त्यांनी माझ्यावर रुसवा धरला होता. सगळं काही ठीक कर. मला आणि माझ्या बाळाला तुझाच आधार आहे. रक्षण कर मां..'' ''काळजी करू नकोस शांता. मां आहे ना..'' राधा शांताला धीर देत म्हणाली. तेवढ्यात ७ वर्षांची एक छोटुशी मुलगी दुडुदुडु करत देवीच्या मूर्तीजवळ आली. ''अगं थांब ममता, पळतेस कुठे? केवढी गर्दी आहे. ही मुलगी ना..'' तिला धरायला तिची आई धावत आली. ''खूप गोड मुलगी आहे तुमची, ताई.'' शांताने मुलीच्या डोक्यावरून हात फिरवला. राधाने तिचे गाल ओढले. तसे तिने गालाचा हुप्प करत राधाचा हात झटकला. ''गोड आहे, पण रागीट आणि हट्टीही आहे. बघितलंत ना? आता हिला दाखवते.

काय गं, गर्दीत कशीही धावतेस. हरवलीस म्हणजे?'' ''मी नाही हरवत. मला सगळे रस्ते माहीत आहेत.'' ''हो का.. सगळे रस्ते माहीत आहेत.'' ''कोणी शिकवलं हे तुला?'' राधाने कौतुकाने विचारलं. ''माझ्या बाबांनी शिकवलं. ते सगळं शिकवतात.'' ''हो, आणि आई तर काहीच शिकवत नाही ना!'' ममताची आई डोळे वटारत म्हणाली. तशी ममताने तिला जीभ दाखवली. राधा आणि शांता दोघींना हसू आवरेना. ''बरं, तू इथे काय करतेस?'' राधाच्या या प्रश्नावर ममताने कपाळावर हात मारला, ''तुम्हाला एवढं माहीत नाही का? मी देवीचं दर्शन घ्यायला आलीय. कारण बाबा म्हणतात की देवी राक्षसांचा वध करते, म्हणून मी देवीकडे प्रार्थना करायला आलीय.'' ममता चुरूचुरू म्हणाली. ''कोण राक्षस?'' शांताने हा प्रश्न विचारला आणि अचानक मागच्या गल्लीतून एक दगड आला आणि शांताच्या पोटावर बसला. शांता कळवळली, मांऽऽऽ.. राधाला काही कळेना, ती घाबरली. ''शांता, काय झालं?'' तेवढ्यात आणखी एक दगड आला, तो एका वृद्ध माणसाच्या डोक्याला लागला. तो किंचाळत खाली कोसळला आणि जागच्या जागी ठार झाला. ममताच्या आईने तिला उचलून घेतलं, तोच एक दगड ममताच्या डोळ्यावर बसला आणि ती बेशुद्धी झाली. तिची आईही कोसळली. पाहता पाहता दगडांचा वर्षाव झाला. अचानक झालेल्या या हल्ल्याने लोक सैरभैर झाले. राधाने शांताला आधार दिला. ''शांता, चल, ऊठ. पळ. इथे थांबू नकोस.'' ''नाही जमत आहे. मला जमत नाही. माझं बा... बाळ... माझं बाळ..'' शांताच्या मूत्रमार्गातून रक्त वाहत होते. राधा घाबरली. तेवढ्यात ५०-६० पुरुषांचा जमाव एकाएकी मिरवणुकीवर चालून आला. त्यांच्या हातात तलवारी, कुऱ्हाडी आणि दगड होते. माणुसकीची कसलीच तमा न बाळगता ते बकरे कापावे तसे माणसे कापत पुढे पुढे येत होते. राधाने पाहिले की मिरवणूक एका मशिदीपाशी आली होती. पकडो, मारो, किसी को भी नही छोड़ना. गावात बातमी पसरली. देवीच्या मिरवणुकीवर हल्ला झाला, हे कळताच लोक आपापल्या घरातून बाहेर पडले, हातात लाठ्या आणि काठ्या घेऊन. आमच्या मिरवणुकीवर हल्ला? हे सहन होणार नाही! पण समोरच्या शस्त्रधारी जमावासमोर लाठ्याकाठ्यांचे काहीच चालेना. दंग्याने आता भयंकर रूप धारण केले. गावच्या रस्त्यावर रक्ताचा पाट वाहत होता. लहान मुले, वृद्ध, बायका कोणालाही दया दाखवण्यात आली नाही. कृपा करा! मला सोडा! राधा तिच्यावर बलात्कार करणाऱ्या पुरुषांना विनवणी करत होती. किमान एकेकट्याने या... पण नुकतीच वयात


वाचकांच्या आग्रहास्तव नारायणी ग्रंथ पुनःप्रकाशित होत आहे.

**॥ नारायणी ॥**

प्रकाशन : ऑक्टोबर २०२४ किंमत : ६००/-रु. । सवलत मूल्य : ५००/-रु.

विवेक प्रकाशन

अनन्य भक्तकुळांची स्वामिनी कोल्हापूरची **'श्री महालक्ष्मी'** म्हणजेच दक्षिणकाशीचे दर्शन या 'नारायणी' ग्रंथाद्वारे आपणास घडणार आहे. श्रीचे माहात्म्य, मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना, मुख्य मंदिरासह परिसर मंदिराचे रंगीत छायाचित्रं. उपासना विभागात श्री महालक्ष्मी स्तोत्रे, सूक्त, कवच, अथर्वशीर्ष, सहस्रनामावली, श्रीयंत्र माहिती व पूजाविधी, ऋषीमुनींनी केलेली स्तुती यांच्या पठणाने श्रद्धेची अनुभूती आपण घेणार आहोत. १२५-१५० रंगीत फोटोद्वारे श्री महालक्ष्मीची विविध रूपातील पूजा, सुवर्ण पालखी, रजत रथोत्सव, अत्यंत दुर्मिळ व पुरातन 'श्रीं' च्या अलंकाराचे मनोहारी दर्शन या ग्रंथाद्वारे घडणार आहे. दैनंदिन पूजा, करवीर यात्रा, नवरात्रोत्सव या सर्वांचे नयनरम्य दर्शन या ग्रंथाद्वारे आपणास होणार आहे.

असा परिपूर्ण ग्रंथ मान्यवरांनी नावाजलेला, शंकराचार्यांचा आशीर्वाद लाभलेला ग्रंथ पूर्णतः रंगीत आर्टपेपरवर पुनः प्रकाशित होत आहे.




Accounts details. - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318

संपर्क : ९५९४९६१८५८



आलेल्या राधाच्या गोऱ्यापान देहाचे लचके तोडणाऱ्या पुरुषांना आता भान राहिले नव्हते. राधाचे नुकतेच लग्न ठरले होते आणि लग्नानंतरच्या त्या पहिल्या स्पर्शाचे स्वप्न रंगवायलाही तिने सुरुवात केली होती. पण तिला कुठे ठाऊक होतं की पुरुषाचा हा पहिला स्पर्श इतका वेदनादायक आणि नकोसा असेल. त्याही अवस्थेत तिने शांता कुठे दिसते का पाहिले. पण शांता निश्चल पडली होती. जिवंत होती की मेली हे कळायलाही मार्ग नव्हता. तिच्याही अंगावरचे कपडे जमावाने शरीरापासून वेगळे केले होते. आणि अचानक राधाने आपली मान वळवली आणि समोरचे दृश्य पाहून गळून पडलेले आपले अवसान एकवटून तिने जोरात लाथ मारली, तसा तिच्या शरीरावर येऊ पाहणारा एक पुरुष मागे जाऊन आदळला. तिला धरलेल्या दोन्ही पुरुषांना तिने हातानेच दूर ढकलले आणि आपले नग्न शरीर सावरत ती वाऱ्यासारखी धावत सुटली, ''ममता? ममता?'' त्या ७ वर्षांच्या छकुलीचा नग्न देह रक्ताच्या थारोळ्यात पहुडला होता. तिला आपल्या शरीराशी कवटाळत राधा ढसाढसा रडू लागली. तेवढ्यात आधीचे ते तिन्ही पुरुष तिच्या अंगावर धावून आले. एका पुरुषाने एखादी वस्तू उचलून भिरकावून द्यावी, तसे ममताला फेकून दिले आणि राधाला दोघांनी पुन्हा एकदा धरले. पण आता राधाच्या अंगात जणू देवीचा संचार झाला होता. तिने दोघांना आपल्यापासून दूर केले आणि धावत रथावर चढली. देवीच्या हातातला त्रिशूल काढत तिने एकाच्या नरडीचा घोट घेतला. मात्र मागून झालेला तलवारीचा वार आधीच रक्तबंबाळ झालेल्या तिच्या कोमल देहाला साहवला नाही. ती धाडकन खाली पडली. ही संधी साधताच त्या दोन पुरुषांनी पुन्हा एकदा तिच्या देहाचा उपभोग घेण्यासाठी तिच्यावर गिधाडाप्रमाणे झडप घातली. राधा देवीच्या मूर्तीकडे पाहून जोरात किंचाळली, ''मां... रक्षण कर..''

'आता शरण नव्हे रण, मारित मारित मरण..' इथे सावरकर दचकून झोपेतून उठले. बाबारावांनी पुढे होऊन त्यांना पाणी दिले. ''तात्या.. वाईट स्वप्न पाहिलंस?'' ''स्वप्न... नाही बाबा. स्वप्न नाही. सत्य. जळतं सत्य. पण कुणीही स्वीकारायला तयार नाही. काँग्रेसच्या खिलाफत आणि असहकार या जोड चळवळीमुळे हिंदू समाजाचे प्रचंड नुकसान झाले. मोपल्यांनी अफझुलखानाचं रूप धारण केलं. हिंदूंची कत्तल झाली. स्त्रियांवर बलात्कार झाला. मंदिरं उद्ध्वस्त झाली. कलकत्ता, नागपूर, दिल्ली सगळीकडे हिंदूंची अवस्था सारखीच.'' ''खरंय तात्या, काँग्रेसला हिंदूंची मनं कळलीच नाहीत. त्यांच्या वेदना त्यांना जाणवत नाहीत. त्यांचा तर्क निराळाच, हिंदू-मुस्लीम ऐक्य. पण कसं? तर अहिंसेने. म्हणजे सगळे हिंदू मुस्लीम झाले की हा भेद आपोआप मिटेल. धन्य आहेत हे मूर्ख लोक! त्यात हिंदू समाजातील वर्णव्यवस्था आणि अपृश्यतेमुळे वाढत चाललेली दरी एक दिवस हिंदू जातीच्या विनाशाला कारणीभूत ठरेल. उद्या भारत स्वतंत्र झाला आणि राज्य हिंदूंकडे आलीं , तर देशात

सुव्यवस्था नांदेल. नाहीतर विनाशच विनाश.'' सावरकरांनी पाण्याचा पेला खाली ठेवला. ''बाबा, दोन्ही आघाड्यांवर काम करावं लागणार आहे. हिंदू समाजाला लागलेली अस्पृश्यता नावाची कीड काढून टाकावी लागणार आहे, जातिभेद नष्ट करावा लागेल आणि त्याचबरोबर हिंदू स्वयंसेवकांची फळी उभारावी लागेल. हिंदूंवरील अत्याचार रोखण्यास सरकारला रस दिसत नाही. हिंदूंनीच आता सज्ज झालं पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढवय्येपणाचा वारसा आपल्याला लाभला असतानाही छद्म अहिंसेच्या पाशात अडकवून हिंदूंना षंढ बनवण्याचं कारस्थान सुरू आहे. सरकारने माझ्यावर हेर नेमलेत, म्हणून मला सावध पावलं उचलाली लागतात. हिंदूंमधील जातिभेद निवारणासाठी मी काम सुरू केलंय. आपलं भाग्य चांगलं की डॉ. आंबेडकरांनी यासाठी व्यापक चळवळ उभी केलीय. पण बाबा, स्वयंसेवकांच्या फळीसाठी तू पुढाकार घे.'' बाबाराव आनंदाने म्हणाले, ''ठीक आहे तात्या. पण तू जरा जपून. आता तू जरा जपून. आता पुन्हा काळे पाणी नको. पुन्हा अटक नको.'' सावरकर चश्मा पुसत म्हणाले, ''नाही बाबा. मी सावधच आहे. एकदा या स्थानबद्धतेतून मुक्तता झाली की माझ्या योजना तयार आहेत.'' ''काय करायचं ठरवलंयस? पुन्हा सशस्त्र क्रांती?'' बाबारावांच्या कपाळावर आठ्या आल्या. ''आपण जे जे ठरवतो ते ते सर्वच साध्य होत नाही. आणि माझ्यासाठी सशस्त्र, अहिंसक, सत्याग्रह सगळ्या प्रकारची क्रांती श्रेयस्कर आहे. भविष्यात मतपेटीतून क्रांती होणार आहे बाबा. त्यासाठी हिंदूंना आधी हिंदूपणाची जाणीव तर झाली पाहिजे.'' ''विनायकराव, बाहेर या!'' कोणीतरी कठोर आवाजात ओरडले. सावरकर आणि बाबाराव एकमेकांकडे पाहून उठले. ''आता काय?'' बाबारावांनी काळजीने विचारले. सावरकरांनी शांतपणे खिडकीजवळ जाऊन पडदा बाजूला केला. घरासमोर काही माणसे जमली होती. काहींच्या हातात काठ्या होत्या. ''चल, बाहेर जाऊन पाहू.'' सावरकर बाबारावांना म्हणाले. बाबारावांनी होकारार्थी मान हलवली, पण त्यांच्या चेहऱ्यावर अस्वस्थता स्पष्ट दिसत होती. दोघेही घराबाहेर आले. समोर नारायणराव उभे होते. त्यांचा चेहरा रागाने लाल झाला होता. त्यांच्या मागे उभे असलेल्या सनातनी जमावाने गोंधळ घालायला सुरुवात केली होती. ''विनायकराव, हे तुम्ही काय करताय?'' ''आम्ही दोघं आत बोलत होतो आणि आता तुमच्यासमोर उभे आहोत.'' सावरकर गंमतीने म्हणाले. ''थट्टा करता का माझी? अहो, अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन त्यांना स्पर्श करता, इतकेच काय तर त्यांच्या घरी जाऊन जेवता! ही कसली हीन पद्धत? आमच्या धर्माला, परंपरांना तुम्ही काळिमा फासता!'' ''आपल्याच देशबंधूंशी प्रेमाने, आपुलकीने वागल्यावर धर्माला काळिमा कसा फासला जाईल? नारायणराव, धर्म म्हणजे काय? माणसाला माणसापासून तोडणारी व्यवस्था? तुम्ही ज्या परंपरेची ग्वाही देता, त्या परंपरेत माणसाचं शोषण करणं श्रेयस्कर मानलं जातं का? उलट तुम्हीच धर्माला काळिमा फासत आहात.'' नारायणरावारांचा पारा चढला, ते चपापले, ''विनायकराव, तुम्ही शहाणपणा शिकवायला लागलात? तुम्ही स्वत: ब्राह्मण कुलोत्पन्न आहात. एवढंदेखील तुम्हाला कळू नये? आमच्या धर्मात शतकानुशतके चालत आलेली व्यवस्था तुम्ही एका क्षणात बदलाल? अस्पृश्यांना स्पर्श करणं, त्यांच्या हातचं खाणं म्हणजे आमच्या पावित्र्याचा अपमान आहे!'' सावरकर एक पाऊल पुढे आले, त्यांच्या आवाजात आता अधिक ठामपणा होता. ''नारायणराव, पावित्र्य हे मनात असतं, हृदयात असतं, कर्मात असतं. तुम्ही म्हणता ती व्यवस्था शतकानुशतकं चालत आली, पण चुकीची व्यवस्था कितीही जुनी असली, तरी ती बदलायलाच हवी! हिंदू समाजाला एकसंघ करायचं असेल, तर अस्पृश्यता नष्ट करावी लागेल. आणि जर तुम्हाला यात अपमान दिसत असेल, तर असं समजा की असा अपमान मी दररोज करणार आहे!'' तेवढ्यात मागून आवाज आला, ''मग तुम्हाला आम्ही वेगळ्या भाषेत समजावून सांगू.'' ही सावरकरांना उघडपणे दिलेली धमकी होती. ''कोण म्हणालं हे? समोर या.'' सावरकर गरजले. ''मला धमकावण्याआधी माझा भूतकाळ व्यवस्थित तपासून घ्या.'' धाडधाड अशी दोन तीन पावले पुढे टाकत ते जमावाच्या अगदी जवळ आले. बाबारावांनी त्यांचा हात धरण्याचा प्रयत्न केला, पण सावरकरांनी त्यांना इशाऱ्यानेच मागे राहायला सांगितले. अचानक शांतता पसरली. हा गोंधळ बघायला आलेले लोक घाबरले. सगळे एकमेकांकडे पाहू लागले. बाबाराव खाकरले. जणू आपल्या भूतकाळाबद्दल फारशी चर्चा करू नये, असा संदेश बाबारावांनी खाकरण्यातून दिला. कारण सरकार सावरकरांना कोंडीत पकडण्यासाठी सज्जच होते. ''काय आहे तुमचा भूतकाळ?'' पुन्हा एकदा गर्दीतून आवाज आला. या वेळी सावरकरांनी बोलणाऱ्याला हेरले होते. दोघांची नजरानजर झाली. सावरकरांनी आपल्या मिशीवरून हात फिरवला. तो दुसरा–तिसरा कुणी नसून सनातन्यांचा वेष धारण करून आलेला ब्रिटिश हेर अशरफ शेख होता. सावरकर सावध झाले. भूतासारखा मानगुटीवर बसतो तो भूतकाळ. आपल्या सर्वांचा भूतकाळ कसाही असला, तरी आता आपाल्याला वर्तमानात सुधारणा करून




चांगले भविष्य घडवायचे आहे. हिंदू बांधवांचे भविष्य उज्ज्वल करायचे आहे. सावरकरांनी शब्द फिरवत प्रसंग सावरून घेतला होता. बाबारावांनी दीर्घ श्वास घेतला.

''विनायकराव, पुरे झालं. तुमच्याशी चर्चा करण्यात काही अर्थ नाही आणि आम्ही काय इथे धमकवायला आलो नाही. तुमच्या भूतकाळाविषयी, देशभक्तीविषयी आमच्या मनात आदरच आहे. पण तुम्ही धर्मात लुडबुड करू नये, नाहीतर ब्राह्मण म्हणून तुमच्यावर बहिष्कार टाकला जाईल.'' ''नारायणराव, तुम्ही बहिष्काराची भाषा करता, पण मला हिंदूंच्या मनातून कोणीही बहिष्कृत करू शकत नाही. मी अस्पृश्यांच्या वस्तीत जाणं थांबवणार नाही, कारण तिथे माझे बांधव राहतात. हिंदू समाजाचा खरा शत्रू बाहेर नाही, तो आपल्यात आहे – ही अस्पृश्यता, हा जातिभेद! आणि जोपर्यंत तुम्ही हे सत्य स्वीकारत नाही, तोपर्यंत तुम्हीच स्वत:ला अंधारात ठेवता, हे लक्षात ठेवा! नारायणराव, जागे व्हा. आपले शत्रू आपल्यात शिरून आपल्यात फूट पाडत आहेत'' असे म्हणत त्यांनी अशरफकडे पाहिले. ''जग बदलतंय, आपल्याला जगात ठामपणे उभं राहायचं असेल, तर आपल्याला आधुनिकता स्वीकारावी लागेल.'' नारायणरावांना काय बोलावे सुचेना. त्यांनी सावरकरांसमोर जोरात हात जोडले. ''आम्ही आता जातोय. पण काहीही झालं तरी रत्नागिरीमध्ये धर्माच्या मुळावर उठलेली तुमची ही थोतांड सुधारणा चालू देणार नाही. चला..'' असं म्हणत ते वळले आणि चालू लागले. तसे जमलेले सनातनीही त्यांच्या मागे चालू लागले. ''तुम्ही–आम्ही सकल हिंदू बंधू बंधू, तो महादेवजी पिता आपुला, चला तया वंदू।'' सावरकरांनी समरसतेची हाक दिली. जमलेल्या सनातन्यांपैकी काही जणांना सावरकरांचे विचार पटू लागले. पण बंड करण्याची धमक त्यांच्यात नव्हती. सनातन्याच्या वेषात असलेल्या अशरफने सावरकरांकडे वळून पाहिले. सावरकरांनी त्याच्याकडे पाहून स्मित केले. शरफला आता कळून चुकले होते की सावरकरांच्या विरोधात पुरावे गोळा करायचे असतील, तर आणखी सावधगिरी बाळगावी लागणार आहे आणि काही करून पुन्हा सावरकरांसमोर यायचे नाही किंवा त्यांनी आपली ओळख पटवू द्यायची नाही. बाबारावांनी सावरकरांच्या खांद्यावर हात ठेवला, ''तात्या, तुझ्या ध्येयाला माझा पूर्ण पाठिंबा आहे. पण आता सावध रहा. सरकार तुझ्यावर नजर ठेवतंय, आणि गावकरीही तुझ्याविरुद्ध गेलेत.'' ''काळजी नको, बाबा. सत्य आणि न्यायाच्या मार्गावर अडथळे येणं स्वाभाविक आहे. पण ही लढाई लढायचीच आहे. कितीही संकटं आली तरी.'' ''ते सर्व ठीक आहे. पण रत्नागिरीत प्लेगचा धोका अधिक वाढतोय. माईला माहेरी पाठवलंस ते बरं केलंस. तशीही दोन जिवांची आहे ती. पण तूही रत्नागिरीच्या बाहेर पड.'' सावरकरांनी मान हलवली.

सावरकरांच्या इच्छेप्रमाणे हिंदू स्वयंसेवकांची फळी निर्माण करण्याच्या हेतूने बाबारावांनी रत्नागिरी हिंदुसभेची स्थापना केली. पण या उद्घाटन कार्यक्रमात सावरकर मुद्दाम सहभागी झाले नाहीत. प्लेगचा धोका वाढत होता. सावरकरांनी सरकारला तसे निवेदन केले होते. अखेर त्यांचे निवेदन मान्य झाले आणि त्यांना नासिकला जाऊन राहण्याची अनुमती मिळाली. रत्नागिरीत आल्यापासून सावरकर विश्रांती न

घेता पछाडल्यासारखे काम करत होते. सावरकर अंदमानात शिक्षा भोगत असताना इथे टिळक युग संपले होते. काँग्रेसने अहिंसेचा अतिरेक केल्यामुळे त्यामुळे हिंदू लोकांतील क्षात्रवृत्ती संपत चालली होती. त्यामुळे सावरकर चिंतित होते. मात्र यात एक आनंदाची बातमी अशी की माई पोटुशी होत्या. त्यामुळे त्यांनी माईंना माहेरी धाडले होते. आता सावरकर कित्येक वर्षांनंतर त्यांच्या जन्मस्थानी म्हणजेच नासिकला जाणार होते. नासिकमध्ये त्यांचे बालपण गेले. त्या गोड आठवणी पुन्हा जिवंत होणार होत्या. सावरकरांचे नासिकमध्ये आगमन झाले, तेव्हा त्यांच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. कारण त्यांना वाटले होते की नासिकच्या लोकांना त्यांचा विसर पडला असेल. पण कल्पनेच्याही पलीकडे त्यांचे भव्य स्वागत झाले. इंग्रजांना नामोहरम करणारा हा नासिकचा पुत्र दिसतो तरी कसा, हे पाहण्यासाठी आबालवृद्ध जमा झाले. नासिककरांच्या डोळ्यांत सावरकरांबद्दलचा आदर स्पष्ट दिसत होता. ठिकठिकाणी सावरकरांचे जंगी स्वागत झाले. नासिकमध्ये त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. एकीकडे हिंदूंना जागृत करत असताना अहिंदू झालेल्या मुस्लिमांना पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचे कार्य त्यांनी आरंभले. काही हिंदूंना मुसलमानांच्या तावडीतून सोडवले. शुद्धीकरणाच्या या चळवळीमुळे सनातनी लोकांबरोबर मुस्लिमांचाही रोष त्यांना पत्करावा लागला. मात्र कोणत्याही गोष्टीने सावरकर थांबणार नव्हते. हिंदू संघटनेचा त्यांचा अश्वमेध सुसाट सुटला होता. कुणी हा अश्वमेध रोखायला आला, तर सावरकर आपल्या बुद्धिचातुर्याने त्याचा पराभव करत. सावरकरांसमोर भल्या भल्या बुद्धिवंतांचे चातुर्य गळून पडायचे. सावरकरांची उजवी बाजू अशी की दलितोद्धार करताना त्यांच्या मनात सहानुभूतीची भावना नव्हती. काही सवर्ण सुधारक उपकार केल्यासारखी सुधारणा करीत सुटले होते. मात्र सावरकरांच्या मनात ब्राह्मण असल्याबद्दल कोणताही अभिमान नव्हता आणि समोरची व्यक्त दलित असल्याबद्दल मनात कसलीही हीनता किंवा दया नव्हती. त्यांच्या मनात होती ती समता, बंधुता आणि समरसता.. म्हणूनच कितीही अडचणी आल्या, तरी त्यांना यश लाभत होते. लोकही त्यांना भरभरून प्रतिसाद देत होते.

देवळाली येथेही सावरकरांचे भव्य स्वागत करण्यात आले. सुमारे पाचशे लोकांचा समुदाय जमला होता. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत, कष्टकरी शेतकऱ्यांपासून विद्वानांपर्यंत सर्व लोक हिंदुत्वाच्या प्रेषिताला पाहण्यासाठी एकवटले होते. त्यात पावसाने जोर धरला. पण कुणीही मागे फिरले नाही. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमान होता.




हा जनसागर वीर सावरकरांचे स्वागत करण्यासाठी जमला होता, तो सुपुत्र, ज्याला नासिकच्या मातीत शेवटचे बेड्यांनी जखडलेले पाहिले होते आणि जो आज एक तेजस्वी क्रांतिकारी बनून परतला होता. आता ही मिरवणूक ढोलताशांच्या गजरात पुढे सरकू लागली. रस्त्याच्या दुतर्फा रंगीत तोरणे, फुलांनी नटलेली झाडे आणि हातात भगवा झेंडा घेतलेली तरुण मंडळी दिसत होती. सावरकर की जय! हा जयघोष आकाशाला भेदत होता. बायका–मुले सावरकरांवर पुष्पवर्षाव करत होते. वाऱ्याच्या धक्क्याने रस्त्याकडची गुलमोहराची झाडे हलू लागली. ही संधी साधून या झाडांनीही सावरकरांवर पुष्पवर्षाव केला. जवळपास एक मैल प्रवास करत ही मिरवणूक एका चौकात थांबली. काही उत्साही तरुण सावरकरांचे दर्शन घेण्यासाठी रस्त्याकडेच्या उंच झाडांवर चढले, तर काहींनी घरांच्या छपरांवर चढून आपल्या नेत्याची एक झलक पाहण्याचा प्रयत्न केला. लहान मुले आईच्या खांद्यावर बसून हातात भगवे झेंडे मिरवीत होती, तर काही स्त्रिया आपल्या साड्यांचा पदर सावरत, डोळ्यातील आनंदाश्रू लपवत मिरवणुकीच्या दिशेने पाहत होत्या. सावरकरांचा चेहरा तेजाने उजळला होता. पण त्यांच्या डोळ्यांत अश्रू होते. ते अश्रू कृतज्ञतेचे होते. नासिककरांनी दाखवलेल्या प्रेमाने त्यांचे अंत:करण भरून आले होते. काही क्षण त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना. सावरकर म्हणजे वक्तादशसहस्रेषू! पण लोकांच्या प्रेमाने या महान वक्त्यालाही अबोल केले. त्यांनी सर्वांसमोर नम्रतेने हात जोडले. तसा सगळ्या जनसमुदायाने वाकून त्यांना नमस्कार केला आणि त्या क्षणी जनसमुदायाने एकच जल्लोष केला. काही इंग्रज अधिकारी हे दृश्य पाहून अस्वस्थ झाले. अशरफही वेष बदलून तिथे उपस्थित होता. तोही स्तब्ध झाला. असा हा कोण आहे हा माणूस, ज्याच्यासाठी एवढा प्रचंड जनसागर उसळतोय? अशी भावना इंग्रज अधिकाऱ्यांच्या आणि हेर अशरफच्या मनात निर्माण झाली. सावरकरांनी हात उंचावला आणि क्षणार्धात सारा गलबला शांत झाला. प्रत्येक जण त्यांच्या शब्दांची वाट पाहत होता. त्यांनी दीर्घ श्वास घेतला आणि मग त्यांचा आवाज आकाशात घुमला, ''माझ्या नासिकच्या बंधुभगिनींनो, तुमचं हे प्रेम, हा विश्वास, माझ्यासाठी संजिवनी आहे. तुम्ही मला बेड्यांनी जखडलेलं पाहिलं, पण आज मी बेड्यांशिवाय तुमच्यासमोर उभा आहे. तरी मी स्वतंत्र नाही. मी तुमच्याबरोबर काम करणारा एक सामान्य सैनिक आहे. मी घायाळ झालेलो आहे. माझी जीभ आणि पाय जखडले गेले आहेत. मी राजकारणात भाग घेऊ शकत नसलो, तरी हिंदू संघटन आणि सामाजिक क्षेत्रे माझ्यासाठी खुली आहेत. मित्रहो, भारतीय महायुद्धाच्या वेळी आशिया खंडात हिंदूंची संख्या ६० कोटी होती. आज ती २२ कोटी आहे आणि अस्पृश्यांची संख्या ७ कोटी आहे. आपण जर स्पृश्य आणि अस्पृश्य असा भेद करत राहिलो, तर केवढीतरी मोठी संख्या आपल्यापासून दूर होईल. आज जो एखादा रामप्रसाद रामाची भक्ती करतो, तो उद्या रमजान होईल आणि त्याच रामाची मूर्ती फोडेल, तेव्हा आपण काय करणार आहोत? त्यात मिशनऱ्यांचे संकट वेगळे. माझी माता–भगिनींनाही हात जोडून विनंती आहे की आपणही आधुनिकता स्वीकारावी. परदेशातील स्त्रिया पुरुषांप्रमाणे सशक्त असतात. मात्र आपल्याकडे अशक्तपणाला सौंदर्य म्हटलं जातं. सौंदर्य हा स्त्रीचा दागिना असला, तरी वेळ पडल्यावर शत्रूवर तुटून पडणाऱ्या झाशीच्या राणीची हिंदू समाजाला नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे स्त्रीला शारीरिक, बौद्धिक आणि शालेय शिक्षण दिलं पाहिजे. हिंदू स्त्री शिकून पुरुषांप्रमाणे ताठ मानेने समाजात वावरली पाहिजे.'' सावरकरांचे शब्द ऐकताना जमलेल्या काही स्त्रियांनी आपला डोक्यावरचा पदर काढून कमरेत खोचला. ''माझ्या देशबंधूंनो, मी इथे उपदेश करायला आलेलो नाही. आधीच म्हटल्याप्रमाणे मीही तुमच्यासारखा एक सामान्य सैनिक आहे. तुमचा सवंगडी आहे. मी स्वत: जातिभेद निवारण्याचा आणि हिंदू संघटनाचा विडा उचलला आहे. मला किती यश लाभेल हे माहीत नाही. पण यात मला यश लाभलं नाही, तर तुमच्यापैकी जे तरुण सुधारणा करून, देशसेवा करून थकून येतील, त्यांचे पाय दाबून देण्याचं काम मी करीन. किमान तेवढी देशसेवा तरी माझ्याने होईल.'' सावरकरांचे हे वाक्य ऐकताच लोकांच्या अश्रूंचा बांध फुटला. लंडनमध्ये जाऊन महान कार्य करून आलेला, काळ्यापाण्याची भयंकर शिक्षा भोगलेला आणि आता स्वत:पुरते न जगता हिंदू समाजाला आपले जीवन अर्पण केलेला थोर देशपुरुष पाय दाबून देण्याची भाषा करतो! मनाचा इतका मोठेपणा, इतकी महानता या वीराकडे कशी आली? जमावाने पुन्हा एकदा आनंदाने टाळ्यांचा कडकडाट केला. पुन्हा एकदा सावरकरांचा जयघोष सुरू झाला. जनसमुदायाला थांबवून सावकरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष सुरू केला. त्या दिवशी नासिकचे रस्ते पावसाच्या पाण्याने भिजले की लोकांच्या अश्रूने, हे कळायला मार्ग नव्हता.

नासिकमध्ये सावरकरांच्या अनेक सभा झाल्या. विविध सण–समारंभातही त्यांची भाषणे झाली. प्रत्येक ठिकाणी त्यांनी सुधारणा, अस्पृश्यता व जातिभेद निवारण, हिंदू संघटन,

स्त्रियांचे सक्षमीकरण या मुद्द्यांवर भर दिला. तरुणांनी माझ्या स्तुतीसाठी काव्ये रचित बसण्यापेक्षा माझ्यापेक्षाही मोठा पराक्रम करावा असा उपदेश ते प्रत्येक तरुणाला करत. यादरम्यान त्यांनी सासुरवाडीलाही भेट दिली. तिथेही त्यांचे स्वागत झाले. त्यांच्या सभांचा, भाषणांचा लेखाजोखा हेराकडून सरकारकडे पोहोचत होता. मात्र सावरकरांना कोंडीत पकडण्यासारखे एकही कारण त्यांना मिळत नव्हते. सरकारकडून त्यांच्यावर आरोप झाले, तर ते हाडाचे वकील असल्यामुळे आपला बचाव व्यवस्थित करत होते. मात्र एक अघटित प्रसंग घडला... १६ ऑगस्ट १०२४ला पांडुरंग महादेव बापट यांच्याशी त्यांची भेट झाली. हो, हो, हे तेच बापट. सावरकरांचे लंडनमधील सहकारी. सेनापती बाटप. ''विनायक, तू जरासुद्धा बदलला नाहीस. आहे तसाच आहेस. तोच उत्साह, तीच जहालता. मला तुझा खूप हेवा वाटतो रे!'' ''पण तू बदललायस बापट. तुलाही अहिंसेची लागण झाली की काय!'' हे वाक्य ऐकाताच सेनापती बापट मोठ्याने हसले. दोघांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली. जमलेले कार्यकर्ते अवाक होऊन पाहू लागले. कुणीही सावरकरांना इतकी थट्टामस्करी करताना पाहिले नव्हते आणि बापटही कधी इतके मोकळे वागले नव्हते. पण या तरुण कार्यकर्त्यांना कुठे माहीत होते की लंडनमध्ये असताना या दोन नवतरुणांमुळे इंग्रजांना घाम फुटला होता. बॉंब बनवायचा फॉर्म्युला काय, भारतात गुपचूप धाडलेली पिस्तुले काय आणि मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीचा केलेला वध काय! ते दिवस मंतरलेले होते. धिंग्रा, अय्यर, बापट या सर्व क्रांतिकारकांनी लंडनमध्ये हिंदूंचे अस्तित्व दाखवले होते आणि सावरकर या सर्व तरुणांचे नायक होते, नेते होते. बापट आणि सावरकरांनी जुन्या आठवणींना वाट मोकळी करून दिली. हिंदुस्थानाच्या सद्य:स्थितीवरही सखोल चर्चा झाली. एकत्र भोजन करूनच दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला. ''विनायक, काळजी घे. तू पकडला गेलास आणि जणू एक चळवळ थांबली. आम्हा सर्व मित्रांना तुझा खूप अभिमान वाटतो.'' ''बापट, तूही काळजी घे. आज तू एका डेंजरस माणसाला भेटला आहेस. इंग्रजांचे हेर तुझ्या मागेही लागायचे.'' हास्यविनोद करून पुन्हा एकदा गळाभेट देऊन दोन्ही देशभक्त आपापल्या मार्गी गेले.

मात्र या भेटीच्या साधारण एक महिन्यानंतर सावरकर पुन्हा एकदा संकटात सापडले. दारावर ठकठक झाली. ''कोण?'' सावरकरांनी आवाज दिला. ''दार उघडा'' असा बाहेरून कठोर आवाज आला. सावरकरांनी दार उघडले. ''सावरकर, तुम्हाला माझ्यासोबत पोलीस चौकीत यावं लागेल.'' बाहेर एक पोलीस शिपाई उभा होता. ''पण का? कारण काय?'' ''ते तुम्हाला साहेबच सांगतील. त्यांचा आदेश पाळणं हे माझं कर्तव्य आहे.'' सावरकरांच्या कपाळावर आठ्या आल्या. असे काय झाले? आणि असे काय सापडले गुप्तहेरांना की थेट शिपाईच दारापाशी आला? सावरकरांच्या गुप्त कारवायांचा सुगावा तर लागला नव्हता? पुन्हा एकदा अटकेचे काळे ढग दाटले होते...

(क्रमश:)


प्राणायाम
एक अमृतानुभव
लेखक - योगतज्ज्ञ मनोज पटवर्धन
आनंदी, निरामय जीवनासाठी सध्या **प्राणायामाला** पर्याय नाही.
त्यामुळे **आजच आपली प्रत नोंदवा आणि आपले आयुष्य सुंदर करा!**


प्राणायाम कोणता करावा, कसा करावा, किती करावा, कधी करावा? या सर्व प्रश्नांची उत्तरे या एका पुस्तकातून आपल्याला मिळतील.
किंमत : २५०/- रु.
१० टक्के सवलतीत उपलब्ध
शिकु या प्राणायाम सहज सोप्या पद्धतीने
Accounts details. - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318
संपर्क : ९५९४९६१८५८